दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816



भगवान परशुराम जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा!

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-३ ■ अंक-७० ■ मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.3 ■ Issue -70 ■ Tuesday, २९ April 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## अल्टीमेटमनंतरही भारत न सोडणाऱ्या पाकड्यांना होणार कठोर शिक्षा

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

**पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारने पाकिस्तान विरुद्ध अनेक कठोर पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे. ज्यामध्ये भारतात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना निश्चित मुदतीच्या आत भारत सोडून जाण्याची नोटीस बजावली होती. त्यानुसार त्यांची अंतिम तारीख २६ एप्रिल होती, तर वैद्यकीय व्हिसा असलेल्यांसाठी ही अंतिम तारीख २९ एप्रिल आहे. त्यामुळे भारत सोडून न जाणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांवर कोणती कारवाई होणार? याबद्दल कायदा काय म्हणतो? याबद्दल सविस्तर माहिती घेऊया.**

जम्मू आणि काश्मीरयेथील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात २६ जणांना आपले प्राण गमवावे लागले. या भ्याड हल्ल्याचा सर्वच स्तरावरून निषेध व्यक्त केला जात असून, दहशतवाद्यांना समर्थन देणाऱ्या पाकिस्तान विरुद्ध कठोर पाऊले उचलण्यासाठी भारत सरकारने अनेक मोठ्या कारवाईला सुरुवात केली आहे. ज्यामध्ये भारतात असलेल्या पाकिस्तानी नागरिकांचा व्हिसा रद्द करून, देश सोडून जाण्याचे अल्टीमेटम परराष्ट्र मंत्रालयाद्वारे देण्यात आले. त्यानुसार प्रत्येक राज्यातील पाकिस्तानी नागरिकांना शोधून त्यांना देशाबाहेर पाठवण्याचा प्रयत्न आता केला जात आहे. असे असून देखील जर कोणताही पाकिस्तानी व्यक्ती दिलेल्या मुदतीच्या आत देश सोडून जर गेला नाही, तर त्यावर कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**मुदतीपूर्व भारत न सोडणाऱ्या पाक नागरिकांना कोणती शिक्षा होणार? –** ३ वर्षांचा तुरुंगवास आणि ३ लाख रुपये दंड होऊ शकतो. २२एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे पाकिस्तानशी संबंधित दहशतवाद्यांनी २६ जणांची हत्या केल्यानंतर सरकारने पाकिस्तानी नागरिकांना ‘भारत सोडून जा’ अशी नोटीस बजावली.

सरकारने ठरवलेल्या मुदतीनुसार भारत सोडून न जाणाऱ्या कोणत्याही पाकिस्तानी व्यक्तीला अटक केली जाईल, खटला चालवला जाईल आणि त्याला तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा जास्तीत जास्त ३ लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतो.

सार्क व्हिसा असलेल्यांसाठी भारत सोडण्याची अंतिम तारीख २६ एप्रिल होती. वैद्यकीय व्हिसा असलेल्यांसाठी ही अंतिम तारीख २९ एप्रिल आहे. १२ श्रेणीतील व्हिसाच्या धारकांना रविवारपर्यंत भारत सोडावा लागतो. व्हिसा ऑन अरायव्हल, बिझनेस, फिल्म, पत्रकार, ट्रान्झिट, कॉन्फरन्स, गिर्यारोहण, विद्यार्थी, अभ्यागत, गट पर्यटक, तीर्थयात्री आणि गट तीर्थयात्री. ४ एप्रिलपासून लागू झालेल्या इमिग्रेशन अँड फॉरेनर्स ॲक्ट २०२५ नुसार, मुदतीपेक्षा जास्त काळ राहणे, व्हिसा अटींचे उल्लंघन करणे किंवा प्रतिबंधित क्षेत्रात अतिक्रमण करणे यासाठी तीन वर्षांचा तुरुंगवास आणि ३ लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

सरकारने अल्टीमेटमनंतर ही भारत सोडून न जाणाऱ्या कोणत्याही पाकिस्तानी व्यक्तीला अटक केली जाईल, आणि त्यावर खटला चालवला जाईल. ४ एप्रिलपासून लागू झालेल्या इमिग्रेशन अँड फॉरेनर्स ॲक्ट २०२५ नुसार, मुदतीपेक्षा जास्त काळ राहणे, व्हिसा अटींचे उल्लंघन करणे किंवा प्रतिबंधित क्षेत्रात अतिक्रमण करणे यासाठी तीन वर्षांचा तुरुंगवास आणि ३ लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

**कायद्यात काय म्हटलयं?**

जो कोणी परदेशी व्यक्ती व्हिसा देण्यात आलेल्या कालावधीपेक्षा जास्त काळ भारतातील कोणत्याही क्षेत्रात राहतो किंवा कलम ३ च्या तरतुदींचे उल्लंघन करून वैध पासपोर्ट किंवा इतर वैध प्रवास दस्तऐवजाशिवाय भारतात राहतो किंवा त्याच्या अंतर्गत कोणत्याही भागात प्रवेश आणि वास्तव्यासाठी त्याला देण्यात आलेल्या वैध व्हिसाच्या अटींचे उल्लंघन करणारे कोणतेही कृत्य करतो, तसेच (ब) कलम १७ आणि १९ व्यतिरिक्त या कायद्याच्या इतर कोणत्याही तरतुदींचे किंवा त्याअंतर्गत केलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा आदेशाचे किंवा या कायद्याच्या अनुषंगाने दिलेल्या कोणत्याही निर्देशाचे किंवा या कायद्याच्या अंतर्गत कोणत्याही विशिष्ट शिक्षेची तरतूद नसलेल्या आदेशाचे किंवा निर्देशाचे उल्लंघन करतो, त्याला तीन वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा किंवा तीन लाख रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात, असे कायद्यात म्हटले आहे. कोणताही पाकिस्तानी भारतात राहू नये याची खात्री करण्याचा अमित शाह यांचा आदेश

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना फोन करून देश सोडण्यासाठी निश्चित केलेल्या अंतिम मुदतीपेक्षा जास्त काळ कोणताही पाकिस्तानी भारतात राहू नये याची खात्री करण्यास सांगितले.

मुख्यमंत्र्यांशी शाह यांच्या दूरध्वनी संभाषणानंतर, केंद्रीय गृहसचिव गोविंद मोहन यांनी मुख्य सचिवांसोबत व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे व्हिसा रद्द करण्यात आलेल्या सर्व पाकिस्तानी नागरिकांना निश्चित मुदतीपर्यंत भारत सोडण्याची खात्री करण्यास सांगितले. महाराष्ट्र सरकारकडून देखील या संदर्भात ठोस पाऊले उचलली जात असून, राज्यातील पाकिस्तानी नागरिकांना भारताबाहेर पाठवण्याच्या हालचालींना वेग आला आहे.

## तू खूप शिक मोठा हो आणि तुझ्यासारख्याच गरजू लोकांची मदत करायला विसरू नकोस



तू खूप शिक मोठा हो आणि तुझ्यासारख्याच गरजू लोकांची मदत करायला विसरू नकोस ... लहानपणापासूनच हुशार असलेल्या बिरुदेव ढोणे या तरुणाचं UPSC परिक्षेतील घवघवीत यश पाहून अनेकांनी त्याचं कौतुक केलं. पण ही कौतुकाची थाप त्याला सहजासहजी मिळालेली नाही. आर्थिक अडचणी त्यात पुढचं शिक्षण कसं करायचं हा मोठा प्रश्न त्याच्या कुटुंबालाही पडायचा. दहावी परीक्षेत ९६ % गुण मिळाले सगळ्यांनी कौतुक केलं पण पुढच्या शिक्षणासाठी जवळ पैसा नव्हता. अशातच मार्गदर्शन करणारी जिवाभावाची मित्र त्याला भेटली आणि आयुष्याचं खऱ्या अर्थानं सोनं झालं. भावासारख्या मित्रांनी बिरुदेवला आर्थिक मदत मिळवून दिली. ’आम्ही शिकलो तुही शिकला की तू सुद्धा अशा गरजूंची मदत करशील!’ असे म्हणत या मित्रांनी त्याला सर्वतोपरी मार्गदर्शन केले. पोस्टमनची नोकरी करत त्यानेही जिद्द आणि चिकाटीने अभ्यास सुरू केला. युपीएससीमध्ये यश मिळेल याची बिरुदेवला खात्री होती. निकाल लागण्यापूर्वी बिरुदेवचा मोबाईल चोरीला गेला. ही तक्रार देण्यासाठी तो पोलिस ठाण्यात गेला. पण या पोलिसांनी तक्रार नोंदवणं तर सोडाच पण त्याच्याकडे साधं बघितलं सुद्धा नाही. मोबाईल जवळ नसल्याने आपण यूपीएससी परीक्षेत घवघवीत यश मिळवलं हे त्याला मित्रांकडून समजलं त्यावेळीही बिरुदेव मेंढ्या चरायला घेऊन गेलेला होता. शिकण्याची प्रचंड इच्छाशक्ती आणि मित्रांचं मार्गदर्शन, पाठबळ यामुळेच हे शक्य झालं असे तो प्रामाणिकपणे सांगताना दिसतो.

## नातेवाईकांच्या जखमांवर मीठ चोळायचंः हेच तुमचं राजकारण का? फडणवीसांनी वडेट्टीवारांना फटकारले!

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पहलगाममध्ये धर्म विचारून पर्यटकांवर गोळ्या झाडल्या, २६ निष्पापांचा बळी गेला, त्यात महाराष्ट्राच्या ६ जणांचा समावेश आहे. देश हळहळतोय, संतापतोयः आणि इथे काही नेते त्या जखमांवर राजकारणाचे मीठ चोळायला मोकळे झालेत! देशभरात संतापाचा भडका उडला आहे.



तरीही
महाराष्ट्रात काही नेते या दुःखावर राजकारण करत आहेत. याला काय म्हणायचे? यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार टीका केली आहे.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्या बेजबाबदार वक्तव्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट घणाघात केला आहे. वडेट्टीवार म्हणाले, दहशतवाद्यांना कुठे धर्म विचारायला वेळ असतो? हे म्हणजे ज्यांनी प्राण गमावले, त्यांच्या नातेवाईकांच्या व्यथेवरही अविश्वास? कुठे चाललेय राजकारण?

यावर फडणवीस संतापून म्हणाले, तिथे वडेट्टीवार नव्हते! मग नातेवाईकांच्या जखमांवर मीठ चोळून मुंबईत कमेंट करण्याचा अधिकार यांना कुठून येतो? प्रसारमाध्यमांनी दाखवलेलं सत्य आणि नातेवाईकांचं थेट सांगणं यालाही हे नेते नाकारतात! तर हे फक्त मूर्खपणाच नाही, तर ही क्रूर असंवेदनशीलता आहे!

मुख्यमंत्र्यांनी थेट सवाल केला आहे की, ज्यांनी जिवंतपणी हत्येचा थरकाप अनुभवला, त्यांच्या सांगण्याला खोटं ठरवणं, हे माणुसकीला शोभतं का? ज्यांनी जवळच्यांचा मृत्यू पाहिला, त्यांचं दुःख खोटं ठरवणं, याहून मोठं पाप दुसरं कोणतं?

देशावर झालेल्या हल्ल्याला कमी लेखणं, आणि मरणाऱ्यांच्या नातेवाईकांच्या भावनांना तुडवणं, हे असंवेदनशीलतेचं नव्हे तर राष्ट्रद्रोहाच्या सीमेला छेद देणारं आहे. देशावर आघात करणाऱ्या घटनेवर राजकीय टीका करताना संवेदनशीलतेचा बळी दिला जातोय का, हे विचार करायची वेळ आली आहे!

## महाराष्ट्र वाघांसाठी ‘यमलोक’, राज्यात चार महिन्यांत २० वाघांचा मृत्यू

**नागपूर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



महाराष्ट्रातील वाघांच्या संख्येत वाढ होत असताना वाघांच्या मृत्यूमध्येही वाढ झाली आहे. महाराष्ट्र वाघांसाठी ‘यमलोक’ झाल्याची चर्चा यामुळेच सुरू झाली आहे. भारतात मागील चार महिन्यांत ६२ वाघांचा मृत्यू झाला. यापैकी २० वाघांचा मृत्यू एकट्या महाराष्ट्रात झाला आहे. वाघांच्या मृत्यूच्या बाबतीत महाराष्ट्र सध्या देशात पहिल्या स्थानावर आहे. मागील चार महिन्यांत मध्य प्रदेशात १७ वाघांचा मृत्यू झाला आहे. यामुळे वाघांच्या मृत्यूच्या बाबतीत मध्य प्रदेश हा महाराष्ट्राच्या खालोलाख दुसऱ्या स्थानावर आहे.

भारतात २०२२ मध्ये वाघांची मोजणी अर्थात व्याघ्रगणना झाली. या व्याघ्रगणनेनुसार भारतात तीन हजार १६७ वाघांची नोंद झाली. राज्यात २०१८ मध्ये ३१२ वाघांची नोंद झाली होती. यानंतर २०२२ च्या व्याघ्रगणनेत महाराष्ट्रात ४४४ वाघांची नोंद झाली. व्याघ्र संवर्धनात आघाडी घेतलेल्या महाराष्ट्रात व्याघ्र मृत्यूची संख्याही वाढली आहे.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणच्या ताज्या आकडेवारीनुसार देशात जानेवारी २०२५ पासून २६ एप्रिलपर्यंतच्या चार महिन्यांत ६२ व्याघ्रमृत्यू झालेले आहेत. यापैकी महाराष्ट्रात २० आणि मध्य प्रदेशात १७ व्याघ्रमृत्यू झाले आहेत. हे मृत्यू प्रामुख्याने वन्यजीवांच्या झुंजीत, अपघातात, शिकार अथवा नैसर्गिक कारणामुळे झाले आहेत. महाराष्ट्रात मागील पाच वर्षात ४१ वाघ आणि ५५ बिबट्यांची शिकार झाली आहे. ही आकडेवारी जानेवारी २०२५ पर्यंतची आहे.

मागील पाच पाच वर्षात शिकाऱ्यांनी देशभरात बेकायदेशिररित्या १०० पेक्षा जास्त वाघांची शिकार केली आहे. यातील काही प्रकरणांचा तपास सुरू आहे तर काही प्रकरणांमध्ये कायदेशीर कारवाई सुरू आहे. आता ऑक्टोबर २०२५ मध्ये नव्या व्याघ्रगणनेची सुरुवात होण्याची शक्यता आहे. अद्याप याबाबत घोषणा झालेली नाही. पण तयारी सुरू असल्याचे वृत्त आहे.

## ‘छावा’ पाहून दाक्षिणात्य अभिनेता विजय देवरकोंडा संतापला!

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दाक्षिणात्य अभिनेता विजय देवरकोंडाने नुकताच विकी कौशलचा ‘छावा’ हा चित्रपट पाहिला. हा चित्रपट पाहिल्यानंतर त्याने आताच एका कार्यक्रमात त्यावर प्रतिक्रिया दिली. छावा या चित्रपटामध्ये विकी कौशल, रश्मिका मंदाना आणि अक्षय खन्ना यांच्या मुख्य भूमिका आहेत. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी केली आहे. विकी कौशलने छावा या चित्रपटात छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारली आहे. तसेच रश्मिकाने संभाजी महाराजांच्या पत्नीची भूमिका साकारली आहे. आणि अक्षय खन्ना यांनी औरंगजेब यांची भूमिका साकारली आहे.लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित हा चित्रपट छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्यगाथेवर आधारित आहे.

विकी कौशलचा ‘छावा’ हा चित्रपट पाहिल्यानंतर त्यातील एका व्यक्तीरेखेवर दाक्षिणात्य अभिनेता विजय देवरकोंडाने तीव्र संताप व्यक्त केला आहे. संधी मिळाल्यास त्या व्यक्तीच्या कानाखाली वाजवण्याची इच्छा विजयने बोलून दाखवली आहे.

साऊथ सुपरस्टार सूर्याच्या आगामी ‘रेट्रो’ या चित्रपटाच्या प्री-रिलीज कार्यक्रमात विजय प्रमुख पाहुणा म्हणून पोहोचला होता. यावेळी निवेदिकेनं विजयला एक प्रश्न विचारला. ङ्गतुला भूतकाळात जाऊन कोणाला भेटायला आवडेलङ्क, असं तिने विचारलं. त्यावर विजयने दिलेलं उत्तर ऐकून सर्वजण चकीत झाले.ङ्कमला ब्रिटिशांना भेटायचं आहे आणि त्यांच्या दोन कानाखाली वाजवायचं आहे. मी नुकताच छावा हा चित्रपट पाहिला आणि त्यानंतर मला खूप राग आला. मला संधी मिळाली तर मी भूतकाळात जाऊन औरंगजेबाच्या दोन-तीन कानाखाली वाजवेन. अशा इतरही अनेक व्यक्तींना मला भेटून त्यांना मारायचं आहे. पण सध्या तरी मला हीच नावं आठवतायतङ्क, असं तो म्हणाला.

## सातवीच्या एनसीईआरटीच्या पुस्तकातून मुघलांचा इतिहास हद्दपार !

**नवी दिल्ली (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

एनसीईआरटीच्या सामाजिक शास्त्र विषयाच्या इयत्ता सातवीच्या पुस्तकातून मुघल आणि दिल्ली राजवटीचे सर्व संदर्भ हटवण्यात आले आहेत. याबदल्यात या पुस्तकांमधून विद्यार्थ्यांना सरकारी योजना तसेच महाकुंभासारखे विषयांवर धडे गिरवावे लागणार आहेत. एनसीईआरटीच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, एनसीईआरटीच्या सामाजिक शास्त्र विषयाच्या इयत्ता सातवीच्या पुस्तकातून मुघल आणि दिल्ली राजवटीचे सर्व संदर्भ हटवून त्याऐवजी सरकारी योजनांसारखे विषयांचा नवीन अभ्यासक्रमात समावेश केला जाणार आहे. प्रकाशित झालेले पुस्तक- ‘एक्सप्लोरिंग सोसायटी : इंडिया अँड बियाँड’ हे सुधारित अभ्यासक्रमाचा केवळ पहिला भाग आहे. तर दुसरा भाग आगामी महिन्यांत प्रकाशित होण्याची अपेक्षा आहे. मात्र, वगळलेला मजकूर दुसऱ्या भागात समाविष्ट केला जाईल का, यावर अद्याप कोणतीही टिप्पणी केलेली नाही. सातवीच्या नवीन एनसीईआरटी पाठ्यपुस्तकांमधून मुघल आणि दिल्ली राजवटीचे सर्व उल्लेख काढून टाकण्यात आले आहेत. याऐवजी, भारतीय राजवंशांवरील प्रकरणे, ‘पवित्र भूगोल’ आणि इतर अनेक संदर्भ जोडले गेले आहेत.

यामध्ये प्रयागराजचा महाकुंभमेळा आणि मेक इन इंडिया आणि बेटी बचाओ, बेटी पढाओ, अटल बोगदा (टनल) सारख्या सरकारी योजनांचा नवीन इयत्ता सातवी एनसीईआरटीच्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. या आठवड्यात प्रकाशित झालेली ही पाठ्यपुस्तके नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम फ्रेमवर्क २०२३ च्या अनुषंगाने तयार करण्यात आली आहेत.

**नवीन अभ्यासक्रमामध्ये काय समाविष्ट केले आहे ?**

एक्सप्लोरिंग सोसायटी : इंडिया अँड बियॉन्ड या सामाजिक विज्ञान पाठ्यपुस्तकात मगध, मौर्य, शुंग आणि सातवाहन यांसारख्या प्राचीन भारतीय राजवंशांवर नवीन प्रकरणे आहेत, ज्यात भारतीय नीतिमत्तावर लक्ष केंद्रित केले आहे. पुस्तकात आणखी एक नवीन भर म्हणजे ङ्गजमीन कशी पवित्र होतेङ्क हे प्रकरण आहे जे भारतात आणि बाहेर इस्लाम, ख्रिश्चन, यहुदी आणि झोरोस्ट्रियन, हिंदू, बौद्ध आणि शीख धर्म यासारख्या धर्मांसाठी पवित्र मानली जाणारी ठिकाणे आणि तीर्थस्थळांवर लक्ष केंद्रित करते.

या प्रकरणात ‘पवित्र भूगोल’ सारख्या संकल्पनांचा परिचय करून देण्यात आला आहे, ज्यामध्ये १२ ज्योतिर्लिंगे, ४धाम यात्रा आणि ङ्गशक्तीपीठेङ्क सारख्या ठिकाणांच्या जाळ्याचे तपशीलवार वर्णन केले आहे. या प्रकरणात नद्यांचे संगम, पर्वत आणि जंगले यासारख्या पूजनीय ठिकाणांचे तपशीलवार वर्णन केले आहे.

# पहलगाम बदला सुरूच!

पहलगाममधील २२ एप्रिलच्या गैर इस्लामी पर्यटकांच्या 'टार्गेटेड किलिंग' नंतर देशभरात संतापाची प्रचंड लाट निर्माण झाली आहे. हा दहशतवादी हल्ला घडवून आणण्यात पाकिस्तानचा हात होता ही गोष्ट सूर्याप्रकशाइतकी स्वच्छ आहे. त्यामुळेच आता भारत पाकिस्तान यांच्यात जणू 'बुद्धिबळाचा' डाव रंगू लागला आहे. दोन्ही देश आपापल्या परीने एकमेकांना शह काटशह देऊ लागले आहेत. भारताने सिंधू पाणी करार एकतर्फी स्थगित करून एक अनपेक्षित चाल खेळली आहे जी पाकिस्तानच्या स्वप्नातही नव्हती. या चालीमुळे पाकिस्तान पूर्णपणे गोंधळून गेला आहे. भारताने पंजाबमधील 'हरिके' धरणाचे दरवाजे बंद करून पाकिस्तानला मिळणारे जादा पाणी (एक्सेस वॉटर) थांबवले आहे. त्याचवेळी कुठलीही पूर्वसूचना न देता झेलम नदीत अतिरिक्त पाणी सोडल्यामुळे पाकिस्तानात झेलम नदीला पूर आल्याचे वृत्त आहे. (आता करार स्थगित केल्याने भारताला पूर्वसूचना देण्याचे बंधन नाही.)

हादरलेल्या पाकिस्तानने प्रत्युत्तर म्हणून सिमला करार रद्द करण्याची घोषणा केली आहे पण तसे अधिकृत पत्र भारताला अजून तरी दिलेले नाही. पाकिस्तानने सिमला करार खरोखरच रद्द केला तर भारतासाठी ती इष्टापत्तीच ठरेल. कसे ते पाहू या. सिमला करार हा १९७१च्या बांगलादेश युद्धा नंतर जुलै १९७२ मध्ये इंदिरा गांधी व झुल्फिकार अली भूत्तो यांच्यात झाला.

या कराराची ठळक कलमे खालीलप्रमाणे होती: १:–काश्मीरचा प्रश्न द्विपाक्षीय चर्चेतून सोडवला जाईल.कुठल्याही तिसऱ्या देशाच्या मध्यस्थीची गरज लागणार नाही.

२– काश्मीर मधील १९७१ च्या युद्धबंदी रेषेला नियंत्रण रेषा म्हणून मान्यता देण्यात येईल. म्हणजेच या युद्धात काश्मीरमधील जिंकलेला प्रदेश त्या त्या देशाकडे कायम राहील. पाकिस्तानने काश्मीरमधील छाम्ब जौरिया विभागात जिंकलेला प्रदेश त्यांच्याकडेच राहिला. भारताने लडाखमधील पाकिस्तानचे एक खेडे जिंकले ते भारताकडेच राहिले. ३–पंजाब, राजस्थान, कच्छ या विभागात जिंकलेला परस्परांचा प्रदेश (अंतरराष्ट्रीय सीमारेषा )दोन्ही देशांनी एकमेकांना परत करावा. यानुसार भारताला पाकिस्तानचा जिंकलेला खूप मोठा भूभाग परत करावा लागला. अंतरराष्ट्रीय सीमेवर पाकिस्तान भारताचा भूभाग जिंकू शकला नव्हता.

४–भारताने बांगलादेश मध्ये शरण आलेल्या ९३००० पाकिस्तानी सैनिकांना युद्धबंदी बनवले होते. त्या युद्धकैद्याना सोडून देणे. पण भारताचे ५४ युद्धबंदी पाकिस्तानमध्ये होते त्यांच्या सुटकेचे कलम या करारात घालण्यास भारत विसरला असे म्हणतात. ही भारताची फार मोठी घोडचूक झाली कारण हे कैदी त्यानंतर पाकिस्तानातच खितपत पडले आणि नंतर पाकिस्तानने याविषयी आपल्या कानावर हात ठेवले.

५–दोन्ही देश परस्परातील विवाद्य मुद्दे चर्चेद्वारा सोडवतील. दोन्ही देशांनी भविष्यात युद्ध न करण्याच्या आणाभाका घेतल्या.

वरील ठळक कलमांच्या आधारे बहुतेकांनी असा निष्कर्ष काढला की सिमला करार पाकिस्तानला पूर्णपणे अनुकूल ठरला.त्यांनी लढाईत गमावलेला प्रदेश तर मिळवलाच त्याबरोबर ९३००० हजार सैनिकांची सुटका 'बिनशर्त' करून घेतली. अनेक विश्लेषकांचे म्हणणे असे आहे की भारताने युद्धकैद्यांच्या मोबदल्यात आझाद काश्मीर मुक्त करून घ्यायला हवे होते किंवा युद्धात इतरत्र जिंकलेला प्रदेश आपल्याकडेच ठेवून घ्यायला हवा होता. या कराराद्वारेभारताने काश्मीर हा वादग्रस्त प्रदेश असल्याचे मान्य केले असाही निष्कर्ष काही तज्ञांनी काढला. फक्त दर वेळी 'युनो'कडे जायची गरज नाही एवढेच काय ते समाधान भारताला लाभले. (भविष्यात पाकिस्तान अजूनही 'युनो' मध्ये काश्मीर प्रश्नाचे तुणतुणं वाजवत आहेच)

एका वार्ताहराने असा दावा केला आहे की 'वाघा' बॉर्डर ओलांडताना भूत्तोनी दरपोक्ती केली की' ख हर्रींश षेश्रशव ींहरीं श्ररवू. (इंदिरा गांधी).त्यांनी असेही म्हटल्याचे ऐकिवात आहे की ते सिमला करार कधीच पाळणार नव्हते. भूत्तोनी इंदिरा गांधींना खिजवले त्यात थोडे तथ्य होते. वाटघाटीमध्ये काही प्रश्नांवर आदल्या रात्री पर्यंत एकमत होत नव्हते. वाटाघाटी निशफळ ठरणार असे वातावरण तयार झाले होते. भूत्तोनी वाटाघाटी सोडून निघून जाण्याची धमकी दिली. अशा वेळी इंदिरा गांधींचे सल्लागार पी एन हक्सर यांनी सूत्रे हाती घेतली. हे हक्सर साम्यवादी विचारसरणीचे व रशियाला अनुकूल असणारे होते. (आताच्या भाषेत 'लेफ्ट लिबरल'.)

हक्सर यांनी अशी भूमिका घेतली की भारत हा पाकिस्तानचा मोठा भाऊ असल्याने त्याने मनाचा मोठेपणा दाखवायला हवा. तसेच बांगलादेशच्या निर्मितीमुळे पाकिस्तान दुखावला गेला होता. पाकिस्तानच्या या भावनेचा भारताने आदर राखायला हवा त्यामुळे जगात भारताचीप्रतिमा उंचावेल (नेहरूची विचारसरणी).हक्सर यांनी रात्री इंदिरा गांधींचे मन वळवले व कराराचा भूत्तोना हवा तसा मसुदा तयार केला. इंदिरा गांधी व हक्सर यांना आपल्या तिन्ही सैन्यदल प्रमुखांना विश्वासात घेण्याची गरज वाटली नाही हे विशेष. (जयराम रमेश यांनी लिहिलेल्या पुस्तकात सिमला कराराविषयी सविस्तर वृत्तांत आहे). (१९६५ च्या युद्धानंतर ताशकंदकराराच्या वेळी लालबहादूर शास्त्री यांच्यावरही प्रचंड दडपण आणून त्यांना सही करायला लावली गेली. शास्त्रीजी आपण जिंकलेली हाजीपीर खिंडपरत करण्यास शेवटपर्यंत तयार नव्हते. शेवटी त्यांनी लष्करप्रमुख जे एन चौधरी यांच्याशी सल्लामसलत करून जड अंतकरणाने तहाच्या अटी मान्य केल्या. हा ताण सहन न होऊन शास्त्रीजीचे आकस्मिक निधन झाले असावे असा प्रवाद आहे.) असा हा सिमला करार ज्यात भारताने युद्धात कमावलेले सर्व यश वाटाघाटीच्या टेबलवर गमावले असे public ercetion तयार झाले. तटस्थ नजरेने पाहिल्यास इंदिरा गांधींच्या काही मजबुरी असाव्यात असे वाटते. एकतर स्वतंत्र बांगलादेश निर्माण झाल्याने भारताचे युद्धाचे उद्दिष्ट पूर्ण झाले होते. आझाद काश्मीर जिंकून घेणे हे या युद्धाचे उद्दिष्ट नव्हते.

भारताने अंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून पाकिस्तानचा मोठा प्रदेश जिंकला तो पाकिस्तानचे काश्मीरवरील ressure कमी करण्यासाठी. हा भूभाग आपल्या ताब्यात कायमचा ठेवणे हेही उद्दिष्ट नव्हते. अमेरिकेशी भारताचे संबंध चांगले नव्हते. भारत रशियावर पूर्णपणे अवलंबून होता. सिमला वाटाघाटी यशस्वी व्हाव्यात म्हणून रशियाचा भारतावर खूप दबाव होता. आजच्याएवढा भारत त्यावेळी समर्थ नव्हता. बांगलादेश निर्वासिताना परत पाठवणे व युद्धाने भारतीय अर्थव्यवस्थेला बसलेला धक्का यातून सावरणे हे दोन ज्वलंत प्रश्न होते. सिमला कराराच्या निमित्ताने इंदिरा गांधींचे मूल्यमापन करताना त्यांच्या मर्यादा लक्षात घेणे अनिवार्य ठरते. पाकिस्तानने आता खरोखरच सिमला करार धुडकाऊन लावला तर भारताला रान मोकळे मिळेल कारण काश्मीर मधील नियंत्रण रेषेला काहीच अर्थ उरणार नाही. भारत सरळ आझाद काश्मीरवर आक्रमण करून तो प्रदेश ताब्यात घेऊ शकेल.

# दुष्टांचा संहार करणारा – ब्राह्म-क्षात्र तेजयुक्त अवतार : भगवान परशुराम

**भगवंताने** विविध काळात भक्ताच्या आणि धर्माच्या रक्षणासाठी अवतार धारण करून धर्मसंस्थापन व अधर्मनाश केला. या अवतारांमध्ये भगवान परशुराम हे एक अत्यंत प्रभावशाली, तेजस्वी आणि अद्वितीय योद्धावतार आहेत. श्रीविष्णूचा सहावा अवतार असलेल्या परशुरामाने ब्राह्मतेज आणि क्षात्रतेज यांचा उत्तम संगम करून अधर्माचा संहार केला.

**१. सप्तचिरंजीवांपैकी एक व काळावर विजय मिळवणारा अवतार–** भगवान परशुराम हे सप्त चिरंजीवांपैकी एक आहेत. त्यांनी काळावर विजय मिळवला आहे, म्हणून ते आजही अदृश्य रूपात पृथ्वीतलावर विद्यमान आहेत. त्यांचे स्मरण प्रातःकाळी केल्याने पुण्यप्राप्ती होते. हे आजच्या तणावपूर्ण जीवनात भक्तांसाठी प्रेरणादायक आहे. मनःशांती, संयम व पराक्रम इसाठी त्यांचे स्मरण करतात.

**२. ब्राह्मतेज आणि क्षात्रतेज यांचा संगम** – परशुराम जन्माने ब्राह्मण होते, पण त्यांनी क्षात्रतेज अंगीकारले. ते पित्याच्या ब्राह्मतेजामुळे ज्ञानी व तपस्वी होते, तर मातेकडून आलेल्या क्षात्रगुणांमुळे पराक्रमी व निर्भय योद्धा होते. आजच्या काळात जबाबदाऱ्या स्वीकारताना 'गुणावर आधारित कर्म' हे तत्त्व त्यांनी कृतीने शिकवले.

**३. अपराजेय योद्धा व शिस्तप्रिय शिष्य** – परशुराम हे केवळ योद्धा नव्हते, तर अत्यंत शिस्तबद्ध व तपस्वी शिष्य होते. त्यांनी कश्यप मुनी आणि शिव यांच्याकडून ज्ञान प्राप्त केले. त्यांनी तपश्चर्येच्या बळावर दैविक अस्त्रविद्या मिळवली. आजच्या तरुणांनी, त्यांच्या शौर्याइतकेच, त्यांच्या साधनेचे व ज्ञानार्जनाचे अनुकरण करण्याची गरज आहे.

**४. शास्त्र आणि शस्त्र यांचा आदर्श समन्वय** – 'अग्रतः चतुरो वेदाः, पृष्ठतः सशरं धनुः' या श्लोकाने परशुरामांच्या व्यक्तिमत्त्वाचे सार सांगितले आहे. त्यांच्या जीवनात ज्ञान आणि पराक्रम यांचा आदर्श संगम होता. त्यांनी शाप देऊन आणि शस्त्राने शत्रूंचा नाश केला. आजच्या युगात 'शिक्षण + शौर्य' हे मूल्य गमावले जात असताना, परशुराम यांचे उदाहरण अत्यंत उपयुक्त आहे.



**५. अधर्माच्या विरोधात प्रखर संघर्ष** – कार्तवीर्य सहस्रार्जुनासारख्या अधर्मी राजाचा नाश करण्यासाठी त्यांनी आधी तपश्चर्या करून सूक्ष्म स्तरावर त्याचा पुण्यकेंद्र दुर्बल केले, मग प्रत्यक्ष युद्धात त्याला पराभूत केले. हे अधर्माच्या विरोधातील संघर्षाचे अद्वितीय उदाहरण आहे. समाजात अनीती वाढत असताना परशुरामांचा हा बाणा आदर्श ठरतो.

**६. गोमातेचे रक्षण आणि क्षत्रिय संहार** – कार्तवीर्याने कामधेनूचे अपहरण केल्यावर, परशुरामाने ती परत आणण्यासाठी उन्मत्त क्षत्रिय संहाराचा संकल्प केला. २१ वेळा पृथ्वी प्रदक्षिणा करून त्यांनी अधर्मी क्षत्रियांना संपवले. यातून 'धर्मासाठी उठलेली शस्त्रे कधीही पवित्र असतात' हे शिकवण मिळते.

**७. वैराग्य आणि दानशूरता** – भगवान परशुराम अत्यंत दानशूर होते. अश्वमेध यज्ञात त्यांनी संपूर्ण भूमी महर्षी कश्यप यांना दान दिली आणि स्वतः महेंद्र पर्वतावर निवास करून संन्यस्त जीवन स्वीकारले. आजच्या काळात सत्ता, संपत्ती आणि अहंकार वाढत असताना त्यांच्या वैराग्याचा आदर्श अत्यंत प्रेरणादायक आहे.

**८. नवसृष्टीचे सर्जनशील कार्य** – परशुरामभूमीची निर्मिती ही केवळ भौगोलिक नव्हे तर आध्यात्मिक नवसृष्टी होती. त्यांनी चितेतून चित्तपावन ब्राह्मणांची निर्मिती करून धर्मकार्याला नवा आयाम दिला. सृजनशीलतेसाठी आंतरिक तेजाचे महत्त्व ते शिकवतात.

**९. गुरुशिष्य परंपरेचे पालन** – भगवान परशुराम हे शिव आणि दत्तात्रेय या दोन अद्वितीय गुरूंचे शिष्य होते. त्यांनी त्यांच्याकडून वेद, आत्मज्ञान, अस्त्रविद्या आणि योगविद्या मिळवली. आजची शिक्षणपद्धती जेव्हा केवळ अंकगणित व तंत्रज्ञानात मर्यादित होते, तेव्हा त्यांच्या गुरुसेवेतील समर्पण आपल्या मनात जागृती निर्माण करते.

**१०. आधुनिक काळातील संदर्भ व महत्त्व** – आजच्या काळात समाजात अनीती, भ्रष्टाचार, अन्याय आणि नैतिक अधःपतन वाढले आहे.

अशा वेळी भगवान परशुराम यांची शिकवण धर्मासाठी कठोर निर्णय, ज्ञान आणि शौर्याचा समन्वय, गुरुशिष्य भाव, वैराग्य आणि राष्ट्रनिष्ठ यांचे महत्त्व अधिक वाढते. युवा पिढीने परशुरामांचे गुण आत्मसात केल्यास ती सामर्थ्यवान, विवेकी आणि निःस्वार्थी होईल. महिलांचा सन्मान, धर्मसंरक्षण, ज्ञानार्जन, संयम आणि आचारधर्म यांचा संगम साधून राष्ट्रविकासात भर घालता येईल.

भगवान परशुराम हे एक महान योद्धा, पराक्रमी तपस्वी, आणि द्रष्टे होते. अशा या ब्राह्मतेजाने आणि क्षात्रतेजाने युक्त अवतारास शिरसाष्टांग नमस्कार करीत, त्यांच्या आदर्शांनी प्रेरणा घेऊन, आपणही जीवनात धर्म व कर्तव्य निष्ठेने जगावे, हाच त्यांच्या चरणी खरा नमस्कार ठरेल.

**– संकलक : सनातन संस्था**
**संपर्क– ९२८४०२७१८०**

# पाकिस्तानसोबत सिंधू पाणी वाटप करार नक्की काय ? त्यातील तरतुदी कशा?–जेष्ठ जलतज्ञ डॉ.राजेंद्र दाते पाटील

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

हा भारत आणि पाकिस्तान या दोन देशांत झालेला नद्यांच्या पाणी वाटपा संदर्भातला करार आहे. सिंधु नदी आणि तिच्या खोऱ्या तील इतर काही नद्यांच्या पाणी वाटपा संदर्भात जागतिक बँकेच्या पुढाकाराने दोन देशांत करार करण्यात आला अशी महत्त्वपूर्ण माहिती आमच्या विशेष प्रतिनीधीसोबत बातचीत करतांना पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव आणि जेष्ठ जलतज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांना दिली.

पुढे बोलतांना ते म्हणाले की,जवळपास दहा वर्षे वाटाघाटी झाल्यानंतर उभयानी पाकिस्तानात कराची येथे १९ सप्टेंबर १९६०ला स्वाक्षऱ्या केल्या भारतातर्फे तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी तर पाकिस्तानतर्फे अध्यक्ष अयुब खान यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या करारातील तरतुदींनुसार सिंधु, चिनाब आणि झेलम या पश्चिमेकडून वाहणाऱ्या नद्यां मधील पाणी पाकिस्तानला वापरता येईल तर रावी, बियास व सतलज या पूर्वेकडच्या नद्यां च्या पाण्याबाबत भारताला सर्व अधिकार असतील. याशिवाय पश्चिमेकडच्या नद्यांतून भारताला एकूण पाण्यापैकी २० टक्के पाणी उपलब्ध करण्याची बाब यात असल्याची माहिती त्यांना दिली आहे.

## कराराच्या नक्की तरतुदी कशा आहेत?

रावी, बियास आणि सतलज या तीन पूर्वे कडील नद्यांच्या पाण्यावर भारताचे विशेष अधिकार क्षेत्र आहे.झेलम,चिनाब आणि सिंधू या तीन पश्चिमेकडील नद्यांच्या पाण्यावर पाकिस्तानचे विशेष अधिकार क्षेत्र आहे.भारत हा वरच्या काठावरील असल्याने ३ पश्चिमेकडील नद्यांच्या पाण्याचा वापर ३ कारणांसाठी करू शकतो: १. सिंचन, २. वाहतूक आणि ३. जलविद्युत निर्मिती सहकार्य आणि डेटाच्या देवाण घेवाणी साठी करारात कायम स्वरूपी सिंधू आयोगाची कल्पना आहे ज्यामध्ये प्रत्येक बाजूने एक आयुक्त असेल. भारत पश्चिमेकडील नदीच्या पाण्याच्या २०% पाण्याचा वापर नौवहन, पूर नियंत्रण, जल– निर्मिती व सिंचनया सारख्या गैर–उपभोगात्मक कारणांसाठी करू शकतो. सिंधूनदी कराराला सर्वात सौम्यपाणी करार का म्हटले जाते ? यावर ते म्हणाले की,भारताने ३ पूर्वेकडील नद्यांचे पाणी देण्यास सहमती दर्शविली आहे, ज्या दरवर्षी ३३ दशलक्ष एकर फूट पाणी वाहून नेतात, तर पश्चिम नद्यांमधून १३५ एमएएफ पाणी वाहून नेता येते.भारत सध्या सिंधू पाण्याचा कमी वापर करत आहे. भारताला सिंधू पाण्याचा २०% वापर करण्याची परवानगी आहे आणि सध्या ते फक्त ४% वापरत आहे. वापराचा वाटा वाढवता येतो.भारत सध्या परवानगी असलेल्या मर्यादेपेक्षा कमी वीज निर्मिती वापरत आहे म्हणजेच भारत पश्चिम नद्यांमधून अंदाजे १८६०० मेगावॅट वीज निर्माण करू शकतो.भारत सध्या फक्त ३००० मेगावॅट वीज निर्मिती करत आहे व आणखी २५०० मेगावॅट बांधकामाधीन आहे. ५८०० मेगावॅट वीज निर्मितीचे नियोजन सुरू आहे. याचा अर्थ असा की आणखी सुमारे ८००० मेगावॅट वापरण्या साठी उपलब्ध आहे.भारताचे नियोजीत प्रकल्प अंमलात आणणे आवश्यक आहे.



आमच्या विशेष प्रतिनीधीनी विचारलेल्या विविध महत्त्वपूर्ण प्रश्नांना उत्तर देताना पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव आणि जेष्ठ जलतज्ञ डॉ राजेंद्र दाते पाटील म्हणाले की, लवाद न्यायालयाची प्रक्रिया ही कराराच्या तरतुदींच्या अधीन राहून, लवाद न्यायालय त्याची प्रक्रिया ठरवते, ज्यामध्ये प्रत्येक पक्षाने युक्तिवाद किती काला वधीत सादर करावा आणि तो पूर्ण करावा हे समाविष्ट आहे. हे निर्णय उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्यांच्या बहुमताने घेतले जातात. प्रत्येक मध्यस्थांना एक मत असते. मतांची बरोबरी झाल्यास, अध्यक्षांना निर्णायक मत देण्याचा अधिकार असतो.

प्रत्येक प्रकरण वेगळे असल्याने लवाद न्यायालयाच्या प्रक्रियेचा कालावधी सांगता येत नाही. २०१३ मध्ये निकाल लागलेल्या किशनगंगा प्रकरणातील लवाद न्यायालयाच्या प्रक्रियेला सुमारे ३ वर्षे लागली.या सर्व बाबी ,(जून २०२३ पर्यंत अपडेटेड ) सिंधू जल करार आहे तरी काय? भारताने बंदी घातली तर पाकिस्तानावर काय होईल परिणाम? सिंधू जल करार नक्की आहे तरी काय?भारताने बंदी घातली तर पाकिस्तानावरकाय होईल परिणाम?

असे एकत्रित प्रश्न विचारले असता ते म्हणाले की,जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या मोठा दहशतवादी हल्ला झाला.भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या वतीने पाकिस्तान सोबतचा सिंधू जल करार स्थगित करण्यात आला आहे. यात नमुद केल्या प्रमाणे पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांच्या आत भारत सोडण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

सिंधू जल करार हा भारत आणि पाकिस्तानमधील एक ऐतिहासिक जल करार आहे, जो १९६० मध्ये स्वाक्षरी करण्यात आला होता. त्यावर भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानचे अध्यक्ष फील्ड मार्शल अयुब खान यांनी स्वाक्षरी केली होती आणि जागतिक बँकेने मध्यस्थी केली होती. या कराराचा उद्देश सिंधू नदी प्रणालीच्या पाण्याच्या वाटपाबाबत भारत आणि पाकिस्तान मधील कोणताही वाद शांततेने सोडवणे हा होता. भारताने सिंधू जल करारावर स्थगिती आणण्याची ही पहिलीच वेळ आहे. पुढे बोलतांना ते म्हणाले की,पाकिस्तानच्या सुमारे ७५ ते ८० टक्के कृषी सिंचन सिंधू नदीच्या पाण्यावर अवलंबून आहे.सिंधू पाणी करारावर भारताने बंदी घातल्याने पाकिस्तानमध्ये पाण्याचे संकट निर्माण होईल आणि त्याचा शेतीवर परिणाम होईल.त्याच वेळी,पाकिस्तान मध्ये सिंधू नदीशी संबंधित अनेक जल विद्युत प्रकल्प आहेत.अशा परिस्थितीत कुठल्या भागावर परीणाम होईल असे जेष्ठ जलतज्ञ डॉ राजेंद्र दाते पाटील यांना विचारले असता ते म्हणाले की,पंजाबसह सिंध प्रदेशातील लोक पाण्यावर अवलंबून असुन पाकिस्तान च्या पंजाब आणि सिंध प्रदेशातील लाखो लोक पिण्याच्या पाण्यासाठी या नदी प्रणालीवर अवलंबून आहेत.


डॉ.राजेंद्र दाते पाटील

आत्तापर्यंत पाकिस्तानला सिंधू, झेलम व चिनाबच्या पाण्याचे हक्क मिळाले.भारताला रावी, बियास आणि सतलजच्या पाण्याचे हक्क मिळाले आहे. तर भारताला पश्चिमेकडील नद्यांवर मर्यादित वापराची परवानगी आहे, पाकिस्तानची कोंडी झाली असे म्हणता येईल काय ? असे विचारल्यावर ते म्हणाले की,भारताने घेतलेल्या निर्णयाने पाकिस्तानची चांगलीच कोंडी होणार आहे. कारण या करारा मुळेच पाकिस्तान मधील बराचसा भाग सिंचनाखाली येतो. त्यामुळे हा करार स्थगिती दिल्याने पाकिस्तानच्या कृषी, उद्योग, आर्थिकदृष्ट्या कोंडी होणार आहे.सिंधू पाणी करार हा भारत आणि पाकिस्तान मधील पाणी वाटप करार आहे, जो जागतिक बँकेने (तेव्हाची आंतरराष्ट्रीय पुनर्रचना आणि विकास बँक) मध्यस्थी केली होती.१९ सप्टेंबर १९६० रोजी कराची येथे भारताचे पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानचे अध्यक्ष अयुब खान यांनी या करारावर स्वाक्षरी केली होती. पुढे ते म्हणाले की,भारताच्या हक्काचे ६३ टीएमसी पाणी कधी घेणार ? हा खरा प्रश्न असून धरणाचे २०% आणि नद्यांचे ८०% पाणी असे एकूण ३३ टीएमसी आणि ४० टीएमसी पाणी असे एकुण ७३% पाणी भारताने अडवून आपल्याला घ्यायचे आहे त्यापैकी १९६० ते २००० पर्यंत भारताने फक्त १० टीएमसी पाणी अडवले आहे.उर्वरीत ६३ टी एम सी पाणी अद्याप भारताला मिळणे बाकी आहे.मग सांगा हे उर्वरीत ६३टी एम सी पाणी अडवले नसल्यामुळे हा कोणाचा फायदा होणार आहे ? यावर गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे

सिंधू नद्यांची व्यवस्था – सिंधू नदी प्रणालीमध्ये सिंधू नदी आणि तिच्या ५ प्रमुख उपनद्या आहेत: १. झेलम, २. चिनाब, ३. रावी, ४. बियास आणि ५. सतलज.सिंधू नदीच्या इतर उपनद्यांमध्ये हे समाविष्ट आहे: झस्कर,श्योक,गिगलगिट, (कुर्रम, गोमल, तोची, विबोआ, संगर आणि काबूल सुलेमान पर्वतरांगांमध्ये उगम पावतात). याचा तपशील देताना जेष्ठ जलतज्ञ डॉ राजेंद्र दाते पाटील म्हणाले की, सिंधू नदी तिबेटमधील कैलास पर्वत रांगातील बोखरचु येथील हिमनदीतून ती उगम पावते. तिबेटमध्ये तिला संघी खंबाब म्हणजेच सिंहाचे तोंड असे म्हणतात.लडाख व बाल्टिस्तान प्रदेशातील झस्कर पर्वतरांगां मध्ये वाहते. ती दर्दिस्तान प्रदेशातील चिल्लर जवळ पाकिस्तानात प्रवेश करते (दर्दिस्तान हा शब्द गॉटलीब विल्यम लीटनर यांनी उत्तर पाकिस्तान, काश्मीर आणि ईशान्य अफगाणिस्तानच्या काही भागांसाठी वापरला आहे. दर्दी भाषा बोलणाऱ्या दर्दी लोकांमुळे ती रोखली जाते आणि म्हणूनच दर्दिस्तान हे नाव पडले).पाकिस्तानमध्ये मिथान कोटच्या थोडे आधी तिला पंजनाद मिळते.जम्मू–काश्मीर मधील लेह जिल्ह्यात सिंधू नदी फक्त भारतातून वाहते.

झेलम नदी काश्मीरमधील वीरिंग येथील पीर पंजालच्या पायथ्याशी असलेल्या झऱ्यां मधून उगम पावते.पाकिस्तानात प्रवेश करण्यापूर्वी श्रीनगरआणि वुलर तलावातून वाहते. झांग येथे चिनाबला मिळते. चिनाब नदी सिंधू नदीची सर्वात मोठी उपनदी. हिमाचल प्रदेशातील केलाँग जवळील तांडी येथे मिळणाऱ्या चंद्रा आणि भागा या दोन प्रवाहांनी बनलेली तिला चंद्रभागा नदी असेही म्हणतात. रावी नदी हिमाचल प्रदेशातील कुल्लू जिल्ह्यातील रोहतांग खिंडीच्या पश्चिमेला उगवते. पाकिस्तानात प्रवेश करण्यापूर्वी सराई सिद्धू येथे चिनाबला मिळते. बियास नदी रोहतांग खिंडीजवळील बियास कुंड येथून उगम पावते. ते हरिकेजवळ सतलजला मिळते. सतलज–मानसरोवर सरोवराजवळील राकास सरोवरात उगम पावते.तिबेट मध्ये तिला लांगचेन खंबाब म्हणजेच घोड्याचे तोंड म्हणून ओळखले जाते.ही एक पूर्वज नदी आहे.

**भारताच्या हक्काचे ६३ टीएमसी पाणी कधी घेणार ?** – धरणाचे २०% आणि नद्यांचे ८०% पाणी असे एकूण ३३ टीएमसी आणि ४० टीएमसी पाणी असे एकुण ७३% पाणी भारताने अडवून आपल्याला घ्यायचे आहे त्यापैकी १९६० ते २००० पर्यंत भारताने फक्त १० टीएमसी पाणी अडवले आहे.उर्वरीत ६३ टी एम सी पाणी अद्याप भारताला मिळणे बाकी आहे.मग सांगा हे उर्वरीत ६३टी एम सी पाणी अडवले नसल्यामुळे हा कोणाचा फायदा होणार आहे ? यावर गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे. किश्तवार जिल्ह्यातील चिनाबची उपनदी असलेल्या मारुसदरवरील पाकल दुल धरण.उधमपूर मधील झेलम वरील सावलकोट धरण.चिनाब वरील किश्तवार जिल्ह्यातील बुरसर धरण.पाण्यावरून अलिकडच्या काळात झालेले संघर्ष किशनगंगा नदीवरील ( पाकिस्तानमधील नीलम नदी) नदीचा प्रवाह प्रकल्प बागलिहार प्रकल्प जम्मू–काश्मीरमधील दोडा जिल्ह्यातील चिनाब नदीवरील नदीचा प्रवाह आहे. सिंध प्रांतातील कराची या बंदर शहराजवळ.सिंधू ही पाकिस्तान मधील सर्वात लांब नदी आहे. नदीची लांबी साधारण:ता ३१८० ते ३८०० किलोमीटर असल्याचे मानले जाते. तिचे एकूण निचरा क्षेत्र सुमारे १,१६५,००० चौरस किमी आहे (त्यापैकी निम्म्याहून अधिक भाग पाकिस्तानच्या अर्धशुष्क मैदानी प्रदेशात आहे). शिगर नदी बाल्टिस्तान मधील स्कार्दूजवळ उजव्या तीरावर सिंधूनदीला मिळते.पुढे गिलगिट नदी ही उजव्या तीराची आणखी एक उपनदी आहे जी तिला बुंजी येथे मिळते.थोड्या अंतरा वर नांगा पर्वताच्या पूर्वेकडील उतारावरून वाहणारी एस्टर नदी डाव्या तीराची उपनदी म्हणून सामील होते. त्यानंतर सिंधू पश्चिमेकडे वाहते आणि दक्षिण आणि नैऋत्येकडे वळून खैबर पख्तूनख्वा प्रांतात प्रवेश करते. या प्रक्रियेत नांगा पर्वत मासिफ च्या उत्तर आणि पश्चिम बाजूंना (२६,६६० फूट (८,१२६ मीटर) १५,००० ते १७,००० फूट (४,६०० ते ५,२०० मीटर) खोली आणि १२ ते १६ मैल (१९ ते २६ किमी) रुंदीच्या खोऱ्यांमध्ये वळते. ४,००० ते ५,००० फूट (१,२०० ते १,५०० मीटर) उंचीवरून नदीकडे पाहणाऱ्या उतारांना पायवाटा खूप कठीणपणे चिकटून राहतात. या उंच प्रदेशातून बाहेर पडल्या नंतर, सिंधू नदी स्वातनदी आणि खैबर पख्तूनख्वा प्रांतातील हजारा भागातून वेगवान पर्वतीय प्रवाहाच्या रूपात वाहते आणि तरबेला धरणाच्या जलाशया पर्यंत पोहोचते. काबुल नदी अट्टोकच्या वर सिंधू नदीला मिळते, जिथे सिंधू नदी २००० फूट (६०० मीटर) उंचीवर वाहते आणि रेल्वे आणि रस्ते वाहून नेणाऱ्या पहिल्या पुलावरून जाते. शेवटी ती कालाबाग जवळील खारट पर्वतरांगा ओलांडून पंजाब मैदानात प्रवेश करते अशी महत्वाची माहिती आमच्या विशेष प्रतिनीधी सोबत बातचीत करतांना पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव आणि जेष्ठ जलतज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांना दिली.

# आईवडिल, भगिणीतील एकात्मता ही कुटुंबाची मोठी शक्ती-ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड



**बदनापूर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

कुटुंबातील सदस्यांमध्ये आणि त्यातल्यात्यात, सासू सून व बंधू भगिणीमध्ये प्रेम, एकवाक्यता, एकमेकांना समजून घेण्याची क्षमता असेल तर असे कुटुंब कसल्याही संकटाला तोंड देण्याची क्षमता जोपासू शकते, असे प्रतिपादन ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी केले.

मालेवाडी येथील धार्मिक सप्ताहनिमित्त आयोजित कीर्तन कार्यक्रमात फड बोलत होते. ज्ञानदेवांना श्री निवृत्तीनाथांनी ज्ञानाचा अथांग सागर सर्वांसाठी खुला करण्यास परवानगी देऊन समाजावर मोठे उपकार केले आहेत. या उपकाराची परतफेड म्हणून का होईना, भाविकांनी श्री ज्ञानेश्वरी, चांगदेव पासष्टी, हरिपाठ, माऊलींचे स्फुट अभंग, श्री निवृत्तीनाथांचे अभंग जीवनात आचरणात आणले पाहिजेत. बंधू भगीणीवर कसे प्रेम करावे, त्यांना कसे घडवावे, अडीअचणीत कौटुंबिक सदस्यातील एकात्मता किती महत्त्वाची असते, ही एकात्मता कशी निर्माण करावी व कशी टिकवावी हे ज्ञानदेव बंधू श्री निवृत्तीनाथांकडून शिकण्यासारखे आहे.

अठरा विश्व दारिर्द्याच्या जाळ्यात अडकूनही मानसिक संपन्नता जोपासून सर्व सम ाजाला ज्ञान देण्याचे कार्य श्री निवृत्तीनाथांनी स्वत: व श्री ज्ञानदेव, सोपानदेव आणि मुक्ताई यांच्या माध्यमातून केले. निवृत्तीनाथांप्रमाणे असे ज्याला वागता येते त्याला चिंता, दुःख, दारिद्रय, ताणतणाव सतावू शकत नाहीत. निवृत्तीनाथांनी समाजहितासाठी गुरूपरंपरेला बगल देऊन एकाने एकाला द्यावे ही गुरूपरंपरा खंडीत करून समाज उध्दाराचे कार्य केले. श्री निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, तुकाराम महाराज आदी संत हे केवळ वाचण्या ऐकण्याचा विषय नाहीत तर ते खऱ्या अर्थाने अनुभवण्याचा विषय आहेत. संत साहित्यातून जीवनदृष्टी मिळत असते.

जीवनातील नैराश्य कमी होण्यास, शांतता लाभण्यास, जीवनमार्ग सापडण्यास संत साहित्य सहायकारी ठरते. म्हणून संत साहित्याचा लाभ घेतला पाहीजे, असेही फड म्हणाले. गावकऱ्यांनी संत श्री ज्ञानेश्वर माऊलींचे स्वागत टाळ, मृदंगाच्या गजरात केले.

फड यांच्या कीर्तनाने आम्हास एक सुंदर अशी नवचैतन्य निर्माण करणारी दृष्टी मिळाली असे संयोजक गावक-यांच्या वतीने म्हणाले. फड यांनी विदयार्थ्यांना मार्गदर्शन केल्याने पालकांनी आनंद व्यक्त केला. कार्यक्रमानंतर सर्व उपस्थितांनी महाप्रसाद देण्यात आला.

# देवगिरी महाविद्यालयाच्या एम.बी.ए. विभागात 'व्यावसायिक जगतात LinkedIn प्रोफाइलद्वारे डिजिटल उपस्थितीचे महत्त्व' या विषयावर विशेष व्याख्यान



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

येथील देवगिरी महाविद्यालयाच्या एम.बी.ए. विभागाच्या वतीने दिनांक २६ एप्रिल २०२५ रोजी 'व्यावसायिक जगतात LinkedIn प्रोफाइलद्वारे डिजिटल उपस्थितीचे महत्त्व' या विषयावर श्री.परिक्षित सूर्यवंशी, Content Manager, एम.जी.एम. विद्यापीठ, संभाजीनगर यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या व्याख्यानातून श्री.सुर्यवंशी यांनी एम.बी.ए. व एम.सी.ए. विभागातील विद्यार्थ्यांना LinkedIn या व्यावसायिक नेटवर्किंग प्लॅटफफॉर्मचा योग्य व प्रभावी वापर कसा करावा, याबाबत मार्गदर्शन केले व LinkedIn प्रोफाईल ऑप्टिमायझेशन, प्रभावी हेडलाइन लेखन, कंटेंट शेअरिंगचे तंत्र आणि नेटवर्किंग कौशल्ये या बाबीं सुलभ आणि सोप्या उदाहरणांसह स्पष्ट केल्या. या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना व्यावसायिक जगात डिजिटल उपस्थिती कशी ठेवावी, नेटवर्किंग कसे करावे व LinkedIn वरून करिअर संधी कशा शोधाव्यात याचे प्रात्यिक्षिकासह ज्ञान प्राप्त झाले. ठोस मार्गदर्शन मिळाले. विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रम अत्यंत संवादात्मक होता. विद्यार्थ्यांनी मनमोकळेपणाने प्रश्न विचारले व LinkedIn चा अभ्यासक्रम, नोकरीसाठी वापर, आणि वैयक्तिक ब्रँडिंगविषयी भरपूर माहिती मिळवली. LinkedIn वरील योग्य उपस्थिती ही आजच्या काळात करिअरसाठी किती महत्त्वाची आहे हे उदाहरणांसह स्पष्ट करण्यात आले. या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, उपप्राचार्य डॉ. रवी पाटील, डॉ. सबिहा शेख, एम.बी.ए. विभाग प्रमुख प्रा. प्रदीप गिऱ्हे, एम.सी.ए. विभागप्रमुख डॉ. विवेक महाले, सर्व एम.बी.ए. आणि एम.सी.ए. विभागातील प्राध्यापक, तसेच सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वर्षा करडखेडकर यांनी केले, प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. शुभम पाटील यांनी करून दिला, तर डॉ. प्रद्युम्न शास्त्री यांनी आभार प्रदर्शन केले.

# कुंभार समाजाच्या अभिमानाचा दिवस : संत गोरोबाकाका पुण्यतिथी सोहळा संपन्न

**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील पळसवाडी इथे संत गोरोबाकाका यांच्या ७०८व्या पुण्यतिथीनिमित्त पळसवाडी गावात गंगामाई आश्रम येथे कुंभार भाविक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत मोठ्या भक्तिभावाने कार्यक्रम संपन्न झाला. कुंभार समाज बांधवांनी तसेच ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने एकत्र येत या दिवशी गोरोबाकाकांना अभिवादन केले. कार्यक्रमाची सुरुवात गोरोबाकाकांच्या प्रतिमेची पूजा व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर ढवळेश्वर संस्थान देभेगावचे मठाधिपती ह.भ.प. ज्ञानदास महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली भक्तीमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.

संध्याकाळी सात वाजता ह.भ.प. दगू महाराज ठेंगडे यांच्या कीर्तनाने कार्यक्रमाची शोभा वाढली.त्यांनी आपल्या कीर्तनातून संत गोरोबाकाकांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकताना त्यांच्या पांडुरंगभक्तीचे विलक्षण उदाहरणे देऊन भक्तीमय केले. गोरोबाकाकांनी आपल्या भक्तीत एवढी तल्लीनता साधली होती की, त्यांनी स्वतः च्या मुलालाही भक्तीच्या वेडेपणात चिखलात तुडवले होते. दोन्ही हात गमावले असतानाही पांडुरंगाने स्वतः प्रकट होऊन त्यांच्या हातून म डकी व गाडगी घडवली, अशी भावस्पर्शी कथा त्यांनी सांगितली.या प्रसंगी स्वाभिमानी कुंभार संघटनेचे जिल्हा संपर्क प्रमुख किशोर जाधव, बाबुराव देवरे, सुभाष देवरे, संजय देवरे, सुदाम देवरे, प्रकाश ठेंगडे,रमेश ठेंगडे, मच्छिंद्र ठेंगडे, नारायण बर्डे, रामदास ठेगडे, अजिनाथ ठेंगडे, संतोष औटे,राजाराम ठेंगडे,धोंडीबा ठेंगडे यांचे सह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाची सांगता हरिपाठ व महाप्रसादाने झाली.

# उपजाती पाहून विवाह जुळवणाऱ्या बौद्ध व्यक्तींवर सामाजिक बहिष्कार घाला: बुद्ध विहार समन्वय समितीच्या अधिवेशनात महत्वाचा ठराव

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

बौद्धानी विवाह जुळवताना उपजाती किंवा पोटजातींना मान्यता देऊ नये, असे करणाऱ्या व्यक्तीवर सामाजिक बहिष्कार घालण्यात यावा, असा महत्वाचा ठराव बुद्ध विहारांच्या तिसऱ्या राष्ट्रीय अधिवेशनात घेण्यात आला. हा ठरावा सामाजिक बदलाच्या दिशेने टाकलेले महत्वाचे पाऊल ठरण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

बुद्ध विहार समन्वय समितीच्या वतीने छत्रपती संभाजीनगरातील संत एकनाथ रंगमंदिरात दोन दिवसीय बुद्ध विहारांचे तिसरे राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. रविवारी या अधिवेशनाच्या समारोपाच्या सत्रात पाच महत्वाचे ठराव घेण्यात आले. त्यात महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी बौद्धांनी सार्वजनिक, खासगी कार्यक्रम तसेच मिरवणुकीत डीजेचा वापर करू नये, पाली विद्यापीठाची स्थापना करण्यात यावी आणि विदेशातून भारतात आणण्यात येणाऱ्या बुद्ध मूर्तीवरील कस्टम ड्युटी, सीमा शुल्क रद्द करण्यात यावे या ठरावांचा समावेश आहे.

**बुद्ध विहारे ज्ञान केंद्रे व्हावीत: नोगुची**

बौद्ध संस्कृती निर्माण करण्यामध्ये बौद्ध विहारांची महत्वाची भूमिका असून बुद्ध विहार हे शिक्षणाचे, ज्ञानाचे केंद्र झाले पाहिजे. केवळ भारतातील बौद्ध विहारांच्या समन्वयाबरोबरच आंतरराष्ट्रीय पातळीवरील बौद्ध विहारांमध्ये सम न्वय साधण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. जेणेकरून बौद्ध संस्कृती जगभरामध्ये रुजवण्यात महत्वाचा वाटा आपण उचलू शकू, असे प्रतिपादन हॅप्पी सायन्स, साऊथ आशिया खंडाचे प्रमुख कोटा नोगुची (जपान) यांनी या अधिवेशनाच्या समारोप प्रसंगी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एम. ए. वाहुळ हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन, चरित्र व साधने प्रकाशन समितीचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप आगलावे, भदंत डॉ. चंद्रबोधी, डॉ. सय्यद रफिक पारनेर, बहुजन संघटनचे प्रमुख राहुल खांडेकर, इंजि. अशोक येरेकर, प्राचार्य सुनील वाकेकर, चेतन कांबळे, ॲड. एस. आर. बोडदे, आदीची यावेळी उपस्थिती होती.



**विधीसाठी समान कार्यक्रम राबवा: वाहुळ**

मुस्लिम, ख्रिश्चन, शीख धर्मात विधी, पूजापाठाचा सारखेपणा आहे, पण बौद्ध धम्मात तो दिसत नाही. त्यामुळे देशभरात बौद्ध धम्मातील पूजापाठ, विधीमध्ये किमान समान कार्यक्रम असावा यासाठी मोहीम राबवण्याची गरज असल्याचे प्राचार्य डॉ. एम.ए. वाहुळ म्हणाले. आपण आपली संस्कृती निर्माण करण्यासाठी, सामाजिक बदलासाठी व्यापक पातळीवर काम करण्याची गरज आहे. उशिराने का होईना त्याची सुरूवात बुद्ध विहार समन्वय समितीने केली आहे, असेही डॉ. वाहुळ म्हणाले.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवसाच्या सुरुवातीला सकाळी ८ वाजता पूज्य भदंत डॉ. चंद्रबोधी आणि उपस्थित भिक्खू संघाच्या उपस्थितीत बुद्ध वंदना व सुत्तपठन घेण्यात आले. त्यानंतर अशोक सरस्वती बौद्ध यांच्या अध्यक्षतेखाली खुले चर्चासत्र संपन्न झाले. त्यात प्रदीप चकमा (त्रिपुरा), भेरुलामा बौद्ध (राजस्थान), देवी दयाल फुले (हरियाणा), राजेंद्र भालशंकर (नाशिक), कैलासचंद खाडिया (राजस्थान), मिलिंद माटे (गोवा), सुब्रम्हणी (तमिळनाडू), बनवरीलाल (दिल्ली), डॉ. ओंकार वानखडे, शशिकांत सिंहजी मोहनन (तामिळनाडू), विनोद बौद्ध (बिहार), राजेंद्र नरहरी (तेलंगणा), प्रा. बी. के. खातरकर (मध्य प्रदेश), महेंद्र बुद्धरत्न, विमलभाई मकवाना (गुजरात), ज्ञानप्रकाश बौद्ध (गुजरात), ओमप्रकाश चौधरी (छत्तीसगड), ए. के. पाटील (पाली परीक्षार्थी), प्रा. घनश्याम धाबर्डे (लेणी संवर्धन), सावित्री मुकुंद नाखले आदींनी सहभाग नोंदवला. बुद्ध विहारांचे समन्वय अधिक व्यापक पद्धतीने करून बुद्ध विहार संस्कृती टिकवण्याची जबाबदारी कशापद्धतीने केली पाहिजे यावर व्यापक स्वरूपात चर्चा झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक सरस्वती बौद्ध, सूत्रसंचालन प्रा. भारत सिरसाट यांनी केले तर आभार अमरदीप वानखडे यांनी मानले.

# देशाची आरोग्य व्यवस्था जगात सर्वात सक्षम आणि मोठी-केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जगात आपल्या देशाची आरोग्य व्यवस्था सर्वात मोठी असून या आरोग्यव्यवस्थेने प्रगती केली आहे.लसीकरण, महिलांचे आरोग्य, बाल आरोग्य तसेच इतर वैद्यकीय सेवा सुविधांम ध्ये आपला देश आघाडीवर असून आपल्या देशात वैद्यकीय पर्यटनाच्या माध्यमातून नवे क्षेत्र खुले झाले आहे,असे प्रतिपादन केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी आज येथे केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान,अंतर्गत आर. के. दमानी मेडिकल कॉलेज, श्री रामचंद्र इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस या महाविद्यालयाच्या कौशलमब - द स्किल लॅबचे उद्घाटन जे.पी. नड्डा यांच्या हस्ते करण्यात आले.

राज्यसभेचे खासदार डॉ. भागवत कराड, उद्योजक कृषी कुमार बागला, उमेश दाशरथी, डॉ.विदेश केसरी,डॉ. सतीश कुलकर्णी, महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. स्वाती शिरेडकर यांच्यासह वैद्यकीय म हाविद्यालयाच्या विविध विभाग प्रमुख तसेच विद्यार्थी उपस्थित होते. श्री. नड्डा म्हणाले की, डॉ. हेडगेवार यांच्या सेवेचा वारसा या रुग्णालयाच्या माध्यमातून पुढे चालवला जात आहे. आणि ही संस्था आरोग्य सेवेसाठी समर्पित आहे. आरोग्य सेवेचे शाश्वत उद्दिष्ट समोर ठेवून मिशन मोडवर या रुग्णालयाने समाजाची गोरगरीब रुग्णांची सेवा केली आहे. या सेवेचे विस्तारित स्वरूप आर के दमानिया रुग्णालय आणि महाविद्यालयाच्या माध्यमातून केले जाईल. बदलत्या आरोग्य सेवेतील तंत्रज्ञानाचा उपयोग सर्वसाम न्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी व्हावा. यासाठी रुग्णालय आणि महाविद्यालयातील प्रत्येक डॉक्टर आणि सेवा च्या माध्यमातून ही संधी उपलब्ध करून दिली आहे. आरोग्य क्षेत्रामधील भारताची प्रगती ही इतर देशांना मार्गदर्शक आहे. लोकसंख्या व भौगोलिक विविधता असूनही आरोग्य व्यवस्था सक्षम आणि अग्रेसर असल्याचे, प्रतिपादन मंत्री नड्डा यांनी केले. जागतिक पातळीवर जास्तीत जास्त डॉक्टर विविध विषयातील तज्ज्ञ निर्माण करण्याची संधी भारताने निर्माण केली असून या देशातील वैद्यकीय सेवा देणारे डॉक्टर परदेशातही आपले विशेष स्थान निर्माण करून आहेत. नवीन विद्यार्थ्यांनी वैद्यकीय सेवा ही एक संधी सम जून समाजसेवा करण्याचे ध्येय ठरवावे, असे आवाहन श्री. नड्डा यांनी विद्यार्थ्यांना केले.

# महाराष्ट्रातील जनतेचा तसेच प्रशासनाचा, २८ एप्रिल हा 'सेवा हक्क दिन' संपन्न

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र शासनाने दिनांक १ एप्रिल, २०२५ रोजी'२८ एप्रिल' हा दिवस महाराष्ट्र राज्याच्या जनतेसाठी तसेच सर्व शासकीय अधिकारी कर्मचा-यांसाठी सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.१० वर्षांपूर्वी म्हणजे दिनांक २८ एप्रिल,२०१५ रोजी महाराष्ट्र शासनाने विशेष करुन तत्कालीन मा.मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणविस यांनी पुढाकार घेऊन महाराष्ट्रातील जनतेला नियत कालमर्यादेच्या आत लोकसेवा प्राप्त करण्याचा हक्क देणारा 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५' अंमलात आणला आहे.या अधिनियमातील कलम ४ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या अधिकारी व कर्मचा-यांवर अशा नियत कालमर्यादेतच जनतेला लोकसेवा देण्याची जबाबदारी दिली आहे आणि त्यासाठी आवश्यक असणारे त्याचे उत्तरदायित्व निश्चित केले आहे.हा कायदा प्रशासकीय अधिका-यांनाकर्तव्य भावनेतून जनतेची सेवा करण्यासाठी प्रेरीत करत आहे. या कायद्याने नव्याने निर्मित केलेल्या राज्य सेवा हक्क आयोगाने आपले ब्रीदवाक्य 'आपली सेवा आमचे कर्तव्य ' असे निर्धारित केलेले आहे.

शासनाने आयोगाच्या शिफारशी नुसार आयोगाने निर्धारीत केलेले बोधचिन्ह व ब्रीदवाक्य हे नागरीकांना दिल्या जाणा-या सर्व अधिसूचित सेवांच्या प्रमाणपत्रांवर मुद्रित केले जात आहे.हे बोधचिन्ह आणि ब्रीदवाक्य शासकीय विभागांकडून त्यांच्या अधिका-यांचा व कर्मचा-यांचा सेवाभाव हेच कर्तव्य ही कर्मयोगाची भावना उर्धृत तर करतेच शिवाय तीत्यांनी अवलंबलेली पारदर्शकता, संवेदनशिलता व कार्यक्षम समयोचितताअशा सर्वोत्तम गुणवत्तेची ग्वाही सुध्दा देत आहे.

**सेवा हक्क अधिनियमाची जडणघडण**

महाराष्ट्र शासनाने सन २००५ मध्येच दफ्तर विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ अंमलात आणला. या कायद्यांतर्गत सुध्दा सर्व विभागांबाबत ते जनतेला देत असलेल्या सर्व लोकसेवांची नागरिकांची सनद त्यांच्या कार्यालयाच्या बाहेर फलकाच्या स्वरुपात दर्शनी भागात प्रदर्शित करतील असे प्राविधान आहे. या नागरीकांच्या सनदेमध्ये लोकसेवा देणा-या अधिका-यांचे पदनाम लोकसेवा देण्यासाठी विहित केलेला कमाल कालावधी तसेच अशा लोकसेवा देणा-या पदनिर्देशित अधिकारी यांचेकडून विलंब झाल्यास किंवा सेवा नाकारल्यास अपील करावयाच्या अधिका-यांचे म्हणजेच प्रथम अपीलीय प्राधिकारी यांचे पदनाम (त्याच विभागाचे गट-ब चे राजपत्रित अधिकारी) तसेच जर प्रथम अपीलामध्ये अपीलार्थिचे समाधान झाले नाही तर द्वितीय अपीलीय प्राधिका-याचे पदनाम (त्याच विभागाचे गट-अ चे राजपत्रित अधिकारी) दर्शविण्यात यावे असे प्राविधान आहे. परंतु विद्यमान मा. मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणविस यांनी स्वत: पुढाकार घेऊन या दफतर विलंबास प्रतिबंध अधिनियम या कायद्याचा परिणाम होत नसल्याचे लक्षात आल्यानंतर दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ हा कायदा अंमलात आणला.

'महाराष्ट्रलोकसेवाहक्कअधिनियम २०१५' कायद्याच्या कलम ५(२) नुसार पदनिर्देशित अधिकारी अर्ज मिळाल्यावर नियत कालमर्यादेत एकतर थेट लोकसेवा देईल किंवा ती सेवा मंजूर करील किंवा फेटाळण्याची कारणे लेखी नमूद करुन अर्ज फेटाळील. पदनिर्देशित अधिकारी, अर्जदाराला त्याच्या आदेशाविरुध्द अपील करण्याचा कालावधी आणि ज्याच्याकडे पहिले अपील दाखल करता येईल त्या प्रथम अपील प्राधिकाऱ्याचे नाव व पदनाम त्या कार्यालयीन पत्यासह लेखी कळिवल अशी जबाबदारी पदनिर्देशित अधिकाऱ्यावर निश्चित केलेली आहे. तसेच कलम-१० नुसार, या कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये पदनिर्देशित अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी कसूर केल्यास रु.५००/- पेक्षा कमी नसेल परंतू रु.५०००/- पर्यंतअसू शकेल एवढी शास्तीचे प्राविधान आहे.

**महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग**

या कायद्यानेया कायद्यातील सेवा हक्क प्राविधानांच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण करण्यासाठी एक निष्पक्ष,स्वतंत्र आयोगाची निर्मिती केली गेली. हा आयोग मुख्य आयुक्त तसेच सहा महसूल विभागांसाठी प्रत्येकी एक आयुक्त यांचा बनलेला आहे. सदर आयुक्तांची नियुक्ती ही सेवानिवृत्त असलेल्या शासन किंवा सार्वजनिक प्राधिकरण यातील प्रशासनाचे व्यापक ज्ञान व अनुभव असलेल्या सार्वजनिक जीवनातील प्रख्यात अशाव्यक्तींमधून केली जाते. या अधिनियमाच्या कलम १६ अनुसार या कायद्याची अंमलबजावणीची सुनिश्चिती करणे व अधिक चांगल्या रितीने लोकसेवा देण्याची सुनिश्चिती करण्यासाठी राज्य शासनाला सूचना करणे हे आयोगाचे कर्तव्यच असल्याचे नमूद केले आहे. लोकसेवा देण्याच्या कार्यपध्दतीमुळे ज्यामुळे लोकसेवा देण्यामध्ये अधिकाधिक पारदर्शकता व सुलभता येईल असे बदल करण्याची शिफारस करणे तसेच लोकसेवा कार्यक्षम पणे देण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणांनी करावयाच्या उपाययोजनांसाठी शिफारस करणे अशा सर्व उपाययोजनां द्वारे आयोगाला सार्वजनिक प्राधिकरणांच्या लोकसेवा देण्याबाबत कामगिरीचे सनियंत्रण करणे असे अधिकार दिलेले आहेत.

**आपले सरकार पोर्टल व म ोबाईल ॲप** – महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ चे कलम २०(२) मध्ये पात्र व्यक्तींच्या अपेक्षांच्या प्रती पदनिर्देशित अधिका-यांना संवेदनशिल करणे आणि नियत कालमर्यादेत पात्र व्यक्तींना लोकसेवा देण्यासाठी माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करणे हे या कायद्याचे प्रयोजन व उद्दिष्ट असल्याचे नमूद केले आहे.

याच कलमाचा अवलंब करुन महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांनी आपण देत असलेल्या जास्तीत जास्त सेवा या त्यांच्या ऑनलाईन प्लॅटफफॉर्मवर देण्याचे अवलंबिले आहे. अशा सर्व विभागांच्या सर्व ऑनलाईन सेवा दिनांक २८ एप्रिल, २०२५ पर्यंत ३३ विभागांच्या अधिसूचित करण्यात आलेल्या एकूण १०२७ सेवांपैकी ५८३ सेवा आपले सरकार पोर्टल व मोबाईल ॲपद्वारे ऑनलाईन देण्यात येत आहेत. अधिसूचित केलेल्या सेवांमध्ये नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील आवश्यक सेवा उदा.जन्म/मृत्यू प्रमाणपत्र,उत्पन्न दाखला,वाहन परवाना, जात प्रमाणपत्र, मृद व जल नमुना तपासणी, बियाणेनमुना चाचणी,किटकनाशके नमुना चाचणी, जेष्ठ नागरिक प्रमाणपत्र,शेतकरी दाखला, वय राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र, अपंगत्व प्रमाणपत्र,रेशनकार्ड,ध्वनिक्षेपण परवाना, सभा-मिरवणूकांची परवानगी, विवाह नोंदणी प्रमाणपत्र,नमुना ८ अ चा उतारा देणे इ. लोकोपयोगी सेवा समाविष्ट आहेत.

सध्या प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये उपलब्ध असलेल्या आपले सरकार सेवा केंद्रामार्फत त्यांच्या विभागाच्या फक्त ७ अधिसूचित सेवांसाठी अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध आहे. परंतु दिनांक २८ जानेवारी, २०२५ च्या शासन निर्णयाद्वारे आता या ग्रामपंचायतीतील केंद्रांना, महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांच्या ऑनलाईन सेवेचे लॉगीन क्रेडेन्शियल्स देऊन त्यांच्या मार्फतसर्व विभागांच्या सर्व ऑनलाईन सेवांना अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यामुळे ग्रामिणांना हव्या असलेल्या कोणत्याही सेवेसाठी कोणत्याही विभागाच्या जिल्हास्तरीय वा तालुकास्तरीय कार्यालयात स्वत: जाऊन आपल्या अर्जाचा पाठपुरावा करण्याची आवश्यकता उरली नाही.

तसेच दिनांक २७ मार्च, २०२५ रोजी माहिती व तंत्रज्ञान विभागाचे सन्मा.मंत्री महोदय यांनी घोषणा केल्याप्रमाणे १०० रुपये अतिरिक्त शुल्क भरुन नागरीकांना त्यांच्या मागणीनुसार आपले सरकार सेवा केंद्र चालकाद्वारे त्यांच्या घरी जाऊन त्यांचा अर्ज त्यांच्या समक्ष ऑनलाईन भरण्याची तसेच सेवा मंजूर झाल्यानंतर त्या सेवेचे प्रमाणपत्र / मंजूरी आदेश त्यांच्या घरी वितरीत करण्याची 'सेवादूत योजना 'सुरु केली आहे.

**२८ एप्रिल 'सेवा हक्क दिन' महोत्सव** – शासनाच्या महसूल विभागाकडून १ ऑगस्ट हा दिवस महसूल दिन म्हणून साजरा करण्यात येतो, तसेच एप्रिल महिन्यामध्ये २१ एप्रिल रोजी नागरी सेवा दिन तर २४ एप्रिल हा राष्ट्रीय पंचायतराज दिन म्हणून साजरा केला जातो परंतु या सर्व विभागांच्या विविध दिनांचा परिपाक म्हणजे २८ एप्रिल सेवा हक्क दिवस हा आहे. हा सेवा

पान ४ वर

## नवनिर्माण बंजारा क्रांती सेना विभागीय उपअध्यक्षपदी श्री अशोक भाऊ राठोड

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



यशस्वी उद्योजक समाज सेवक डॅशिंग व्यक्तिमत्व राजकारणातील चाणाक्ष बुद्धिमत्ता अशी ओळख असणारे श्री अशोक भाऊ राठोड यांना नवनिर्माण बंजारा क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष किरण भाऊ चव्हाण व राष्ट्रीय अध्यक्ष डॉ मुकेश भाऊ राठोड महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रमेश भाऊ चव्हाण प्रदेश कार्याध्यक्ष श्री सचिन भाऊ राठोड महिला प्रदेशाध्यक्ष आशाताई राठोड मराठवाडा अध्यक्ष रामभाऊ राठोड यांच्या नेतृत्वामध्ये यांची निवड विभागीय उपअध्यक्षपदी करण्यात आली आहे. श्री अशोक भाऊ राठोड यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

## नवविवाहित प्रकरणातील फरार आरोपी अटकेत,याच घटनेतील वाहनाच्या धडकेतील इसमाचा मृत्यु

**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील इंदापूर चौफुलीवर नव विवाहितेचे शुक्रवारी (दि.२५) सायंकाळी अपहरण प्रकरणातील मुख्य आरोपी फरार होते मात्र या आरोपींना शोधण्यासाठी खुलताबाद पोलीस ठाण्याच्या वतीने दोन पथके आरोपीच्या मार्गावर रवाना करण्यात आली होती, मात्रा या दोन्ही पथकाला आरोपीला ताब्यात घेण्यासाठी अपयाश आले होते मात्र बाजार सावंगी चौकीचे बीट जमादार यांनी फरार आरोपी यांना रविवारी (दि.२७) अटक केले बाजारसावंगी पोलीस चौकीचे बीट जमादार विनोद बिघोत व दिलीप बनसोड यांनी गुप्त खबरयाने दिलेल्या माहिती वरून अटक केली.याच घटनेत आरोपींनी वापरलेली क्रेटा गाडी क्रमांक एम.एच. २८, ए. झेड. ६६९९ या गाडीने फुलंब्री-कन्नड रोडवर पंडित केरुबा भालेराव वय ५२ वर्षे यांना जोरदार धडक दिली होती,सदरील अपघात शुक्रवारी (ता.२५) घडला होता,त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दाखल केले होते उपचार घेत असतांना रविवारी (ता.२७) त्यांचा मृत्यू झाला.मयत भालेराव हे इंदापूर ग्रा.प.चे पाणीपुरवठा कर्मचारी होते, नवविवाहित अपहरण प्रकरणाने वेगळेच वळण घेतले असून,यातील सर्व आरोपी अटकेत आहेत, त्याचबरोबर अपघाताचा गुन्हा ही याच प्रकरणातील दाखल झाला आहे.

## वेरूळ लेणी येथे या खाजगी सुरक्षा एजन्सी हायअलर्ट मोडवर



**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील जगप्रसिद्ध वेरूळ लेणी येथे पर्यटकाची तपासणी जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे नुकताच झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर देशभरात सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.याच पार्श्वभूमीवर भारतीय पुरातत्व विभागाने वेरुळ लेणी येथे ही सुरक्षा वाढवली आहे. रविवारी वेरुळ लेणी परिसरात पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती दरम्यान सुरक्षा रक्षकांकडून लेणीच्या प्रवेश द्वारावर पर्यटकांची झाडा झडती घेऊनच आत मध्ये प्रवेश देण्यात येत होते.

सुरक्षेच्या दृष्टिकोनातून जगप्रसिद्ध वेरुळ लेणीमध्ये देशी-विदेशी पर्यटक येत असतात. तथापि,रविवारी प्रवेश देताना प्रत्येक पर्यटकाची कसून तपासणी करण्यात येत असून संशयास्पद व्यक्तींवर विशेष लक्ष ठेवले जात आहे.

भारतीय पुरातत्व विभाग यांच्या कडून तपासणी मोहीम राबवली जात असून कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासन सतर्क आहे.पर्यटकांनी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वेरुळ हे जागतिक वारसा स्थळ असल्याने येथे देशी-विदेशी पर्यटकांची वर्षभर मोठी वर्दळ असते. रविवारीही हजारो पर्यटक वेरुळ लेणी परिसरात दाखल झाले होते.गर्दीच्या विचाराने सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क झाल्या आहेत.भारतीय पुरातत्व विभागाच्या निर्देशा नुसार एसआयएस (SIS) सुरक्षा रक्षकांच्या वतीने प्रवेशद्वारीवर प्रत्येक पर्यटकाची कसून तपासणी करण्यात येत आहे तसेच संशयास्पद हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. विशेष म्हणजे तपास कामी मेटल डिटेक्टर व इतर उपकरणांचा वापर करण्यात आलेला नाही, फक्त झाडांची झाडणी करून तपासणी केली गेली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सुरक्षा कर्मचारी दिवसभर दक्ष राहिले.

## पाकिस्तानी युट्यूब चॅनल बंदीनंतर सरकारचा 'बीबीसीला' इशारा

**नवी दिल्ली**

पहलगाम हल्ल्यानंतर भारत- पाकिस्तानात तणावपूर्ण वातावरण आहे. हे संबंध आणिखी ताणले जाऊ नयेत म्हणून केंद्र सरकारने १६ पाकिस्तानी युट्यूब चॅनेल ब्लॉक केल्यानंतर आता सरकारने बीबीसीला देखील इशारा दिला आहे. हे प्रकरण अधिक चिघळू नये म्हणून सरकारकडून दक्षता घेण्यात येत आहे. सरकारने म्हणलं आहे की, बीबीसीसह सर्व विदेशी वाहिन्यांनी हे लक्षात ठेवावे की, त्यांना भारतात प्रसारण करण्याचा त्यांचा परवाना हा त्यांना दिलेला एक विशेषाधिकार आहे. मात्र हा अधिकार मिळाला असला तरी देखील देशातील नियम आणि कायदे पाळणे त्यांना बंधनकारक आहे. मात्र तरी देखील तुम्ही तुमचे पुर्वग्रह देशात पसरवत असाल तर तुम्हाला भारतात प्रसारण करण्याचा तुमचा अधिकार नाकारण्यात येऊ शकतो. केंद्र सरकारकडून ६ पाकिस्तानी युट्यूब चॅनेल ब्लॉक केल्यानंतर सरकारने बीबीसीला देखील इशारा दिला आहे. कारण बीबीसीकडून पहलगाम दुर्घटनेनंतर प्रसिद्ध झालेल्या एका लेखामध्ये बीबीसीने भारतीयांचे व्हिसा पाकिस्ताने निलंबित केले असल्याचे म्हटले आहे. तसेच त्यांनी दहशतवाद्यांना दहशतवादी नाही तर उग्रवादी म्हटलं आहे. मात्र हे उग्रवादी नसून दहशतवादीच होते. जे पाकिस्तानमधून आल्याचं देखील सांगितलं जात आहे. देशभर संतापाची लाट उसळली आहे. त्यात बीबीसीने मात्र वेगळी भूमिका घेतल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार, पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्रीय गृह मंत्रालयाच्या शिफारशींनुसार १६ पाकिस्तानी युट्यूब चॅनेल ब्लॉक केले आहेत. प्रक्षोभक आणि सांप्रदायिकदृष्ट्या संवेदनशील सामग्री पसरवल्याबद्दल एकूण ६.३ कोटी सबस्क्राइबर असलेल्या सोळा पाकिस्तानी यूट्यूब चॅनेलवर भारतात बंदी घालण्यात आली आहे.

## राज्य सेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव बुधवारी (दि.३०) आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्रावर

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. किरण जाधव हे छत्रपती संभाजीनगर आकाशवाणी केंद्र येथे बुधवारी (३० एप्रिल) आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्रावरील एका कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करणार आहे. आयुक्त डॉ. किरण जाधव यांची सेवा हक्क आयोगाच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त प्रासंगिक या सदराखाली घेतलेली मुलाखत बुधवार दि.३० एप्रिलला सकाळी १० वा. ४५ मि. नी. आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर येथून प्रसारित होणार आहे. जाधव हे महाराष्ट्र राज्य सेवा हक्क अधिनियम २०१५ च्या अनुषंगाने नागरिकांना जागृतीपर मार्गदर्शन करणार आहेत.

## भारत खरेदी करणार २६ मरीन राफेल फायटर्स

### फ्रांन्सशी झाला ६४ हजार कोटी रुपयांचा करार

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

भारत सरकार नौदलासाठी २६ राफेल मरीन लढाऊ विमान खरेदी करणार आहे. यासंदर्भात आज, सोमवारी फ्रान्सशी ६४ हजार कोटी रुपयांच्या खरेदी करारावर शिक्कामोर्तब करण्यात आले. या कराराच्या स्वाक्षरी कार्यक्रमावेळी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह आणि नौदलाचे व्हाइस चीफ व्हाइस ॲडमिरल के. स्वामीनाथन उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील या महिन्याच्या सुरुवातीला सुरक्षा विषयक मंत्रिमंडळ समितीने भारतीय नौदलासाठी २६ अत्याधुनिक राफेल-मरिन लढाऊ विमानांच्या खरेदीला मंजुरी दिली होती. या स्पर्धात्मक प्रक्रियेत अमेरिकन बोईंग एफ/ए १८ सुपर हॉर्नेटचाही समावेश होता. पण भारतीय नौदलाने राफेल लढाऊ विमानांची निवड केली. राफेल हे भारतीय आवश्यकतेनुसार अधिक योग्य असल्याचे आढळून आले. त्यामुळे राफेलची निवड करण्यात आली आहे.

ही राफेल विमाने अत्याधुनिक शस्त्र प्रणालींनी सुसज्ज असतील. यात लांब पल्ल्याची हवेतून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे, जहाजविरोधी क्षेपणास्त्रे आणि इलेक्ट्रॉनिक युद्ध यांचा समावेश असेल. या करारानुसार भारतात विमाने निर्मिती करणे अनिवार्य नसले तरी, राफेलमध्ये सहभागी असलेल्या डसॉल्ट, थेल्स आणि एमबीडीए सारख्या फ्रेंच कंपन्या त्यांच्या भारतीय भागीदारांना स्थानिक पातळीवर उपकरणे आणि उपप्रणाली निर्मितीसाठी ऑर्डर देण्याची शक्यता आहे.

या करारातर्गत २२ सिंगल सीट राफेल-एम आणि ४ डबल ट्रेनर सीट राफेल-एम विमाने भारताकडून खरेदी करण्यात येणार आहेत. हिंदी महासागरातच ही विमाने तैनात केली जाणार आहेत. युद्धनौका तसेच अणुप्रकल्पांवर हल्ला करण्यात ही विमाने तरबेज मानली जातात. आयएनएस विक्रांत या युद्धनौकेवर या विमानांचा तळ असेल. याआधीही भारताने सप्टेंबर २०१९ मध्ये फ्रान्सकडून ३६ राफेल लढाऊ विमानांची खरेदी केली होती. त्यासाठी ५९ हजार कोटी रुपये मोजले होते.

## अक्षय तृतीयेचा मुहूर्त ; बालविवाह विरोधी पथके सतर्क

### आपल्या जवळपास होणाऱ्या बालविवाहांची माहिती कळविण्याचे प्रशासनाचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

अक्षय तृतीया हा सण बुधवार दि.३० रोजी आहे. या मुहूर्तावर अनेक विवाह होत असतात. त्यात बालविवाह होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी जिल्हा, तालुका व गावस्तरावरील शासकीय यंत्रणांनी सतर्क रहावे,असे आदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी यंत्रणांना दिले आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये बालविवाहाचे प्रमाण लक्षात घेता बालविवाह निर्मूलनासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे. या कृती दलाने बालविवाह निर्मूलन कृती आराखडा तयार केला आहे. त्यानुसार सर्व संबंधित विभागाच्या समन्वयाने जिल्ह्यात बालविवाह रोखण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. दि.१ एप्रिल २०२४ ते आजपर्यंत एकूण ८८ बालविवाह या कृती दलामार्फत थांबविण्यात आले आहेत. चार प्रकरणांमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोग,नवी दिल्ली यांच्या निर्देशान्वये जिल्ह्यामध्ये बालविवाह निर्मूलनासाठी विविध जाणीव जागृतीपर उपक्रम घेऊन जनसामान्यांमध्ये बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ या कायद्याची जाणीवजागृती व्हावी व बाल वयात बाल हक्कांपासून बालके वंचित राहू नयेत यासाठी सर्व संबंधित यंत्रणाच्या समन्वयाने कार्यवाही करण्याचे कामकाज सुरू आहे. दरम्यान या महिन्यात बुधवार दि.३० रोजी असणाऱ्या अक्षय तृतीया या सणाच्या शुभ मुहूर्तावर अनेक बालविवाह होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे सगळे बालविवाह रोखण्याकरिता जिल्ह्यातील तालुका व गावस्तरावरील शासकीय यंत्रणांनी सतर्क रहावे असे आदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

बालविवाह प्रतिबंध अधिनियम२००६ या कायद्यान्वये मुलीचे वय १८ वर्ष व मुलाचे वय २१ वर्षाच्या आत असतांना विवाह केला तर असा विवाह बालविवाह म्हणून गणला जातो. असा विवाह केल्यास आयोजकांना अधिनियमानुसार एक लाख रुपये आर्थिक दंड व दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद किंवा दोन्ही शिक्षेचे प्रावधान आहे.

तसेच ६ जून २०१३ (सुधारित २१.१०.२०२२) च्या शासन आधिसुचनेनुसार ग्रामपंचायतसाठी ग्रामसेवक व १८ ऑगस्ट २०१६ (सुधारित २१.१०.२०२२) च्या अधिसुचनेनुसार नागरी भागाकरिता बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) हे बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून घोषित केले आहेत. जिल्ह्यामध्ये कोठेही बालविवाह होत असतील किंवा होऊ घातले असतील तर नागरिकांनी अशी माहिती चाइल्ड हेल्प लाइन १०९८ तसेच ११२ या मोफत हेल्प लाईन नंबरवर फोन करून द्यावी.

माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येते. आपल्या नजिक होत असलेल्या बालविवाहाची माहिती नजीकचे पोलिस स्टेशन/ग्रामपंचायत कार्यालय/पंचायत समिती/बाल कल्याण समिती/ जिल्हा बाल संरक्षण कक्ष तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय येथे देखील तात्काळ संपर्क साधून द्यावी,असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीमती रेश्मा चिमंद्रे यांनी केले आहे.

## पैठण येथील श्रीमहानुभाव दत्त मंदिर विकास आराखड्यास उच्चाधिकार समितीची मान्यता



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पैठण येथील ऐतिहासिक व महानुभाव पंथाचे महत्त्वाचे तीर्थस्थळ असलेल्या श्रीमहानुभाव दत्त मंदिराच्या विकास आराखड्याचे आज मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकारी समिती समोर सादरीकरण झाले. या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी तयार करण्यात आलेल्या २५ कोटी रुपयांच्या आराखड्यात काही बदल सुचवत या आराखड्यास मान्यता देण्यात आली व सुधारीत आराखडा सादर करण्याचे आदेश देण्यात आले.

दुरदृष्य प्रणालीद्वारे हे सादरीकरण झाले. राज्याच्या मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक यांच्यासमोर हे सादरीकरण करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, पैठण नगरपालिकेच्या मुख्याधिकारी पल्लवी अंभोरे. मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष शेवलीकर आदी जिल्हा मुख्यालयातून उपस्थित होते. श्रीमहानुभाव दत्त मंदिर ट्रस्ट हे महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्रीचक्रधर स्वामी यांच्याशी संबंधित आहे. ११८९ च्या सुमारास चक्रधर स्वामी या भागात वास्तव्यास होते. श्री स्वामी त्र्यंबकेश्वर ते राहेर या समग्र गोदावरी काठी विहार करीत. येथेच त्यांनी आपल्या अनुयायांना उपदेश केले. त्यामुळे हे स्थळ महानुभाव पंथियांसाठी महत्त्वाचे आहे. या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी २५ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला. त्यात भक्तनिवास, सभागृह, ग्रंथालय, स्वच्छता गृह, वाहनतळ व परिसर सुशोभिकरण आदी कामे करण्यात येणार आहेत. या आराखड्यात मुख्यसचिव श्रीमती सौनिक यांनी व समिती सदस्यांनी काही फेरबदल सुचविले. पर्यावरण पूरक रचना व सौर उर्जेचा अधिकाधिक वापर, तसेच वृक्ष लागवड, पदपथ आदी दुरुस्त्या सुचविल्या. त्यानुसार आराखडा सुधारीत करुन पुन्हा सादर केला जाईल. या संदर्भात दि.१० मे नंतर पुढील बैठकीत अंतिम निर्णय होईल,असे सांगण्यात आले.

पान ३ वरून

## महाराष्ट्रातील जनतेचा तसेच प्रशासनाचा, २८ एप्रिल हा 'सेवा हक्क दिन' संपन्न

हक्क दिन महाराष्ट्र शासनाच्या प्रत्येक कार्यालयाकडून त्यांनी या वर्षभरात जनतेला दिलेल्या सेवांचा तसेच त्यांच्या सेवा हक्कांच्या अंमलबजावणीच्या कार्यवाहीचा वार्षीक लेखाजोखा त्यांच्या लाभार्थिंना बोलावून किंवा जनतेच्या लोकप्रतिनिधींना बोलावून साजरा करायचा आहे.या दिवशी सर्व जिल्हा मुख्यालयांमध्ये सर्व जिल्हाधिकारी आपल्या जिल्हयाचे पालकमंत्री, खासदार, आमदार यांना विशेष आमंत्रित करुन तसेच सर्व जिल्हयांच्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांना बोलावून समारंभपूर्वक सर्व विभागांच्या विगत वर्षाच्या कामाचा आढावा घेतील.तसेच उपस्थित सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारीही या दिवशी त्यांच्या सेवानिष्ठेची,सचोटीची, सौजन्यतेची कटिबध्दता अधोरेखीत करणारी त्यांना नेमून दिलेली सेवा हक्क शपथ सुध्दा घेतील.

तसेच या महोत्सवी कार्यक्रमात ज्या अधिकारी /कर्मचाऱ्यांनी या अधिनियमाच्या अनुसार सचोटीने व १००% प्रकरणांमध्ये नियत कालावधीत जनतेला अधिसूचित सेवा दिल्या असतील त्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांचा विशेष प्रशस्तीपत्र देऊन मा. पालकमंत्री यांच्या हस्ते सन्मान करण्यात येईल.तसेच या दिवशी महाराष्ट्र शासनातर्फे मा. पालकमंत्री हे जनतेला तसेच शासकीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतील.

महाराष्ट्र शासनाने आपले सरकार सेवा पोर्टल हे पात्र व्यक्तींसाठी बहुतांश विभागांच्या कोणत्याही अधिसूचित लोकसेवेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी संयोजित व्यासपीठ आहे. htt://aalesarkar:mahaonline.gov.in आजवर ०१,०७,५१,००० नागरीकांनी या संकेतस्थळावर नोंदणी करुन सेवा घेतली आहे. याखेरीज आरटीएस महाराष्ट्र हे मोबाईल ॲप गुगल प्ले स्टोअर / ॲपल स्टोअर वर विनामूल्य उपलब्ध आहे. अर्जदार मराठी किंवा इंग्रजी पर्याय निवडू शकतो. पात्र व्यक्ती स्वत: अर्ज करु शकत नसल्यास महाराष्ट्रातील सर्व जिल्हयामध्ये कार्यान्वित असलेल्या ३९,७८३ आपले सरकार सेवा केंद्रांद्वारेही अर्ज करुन सेवा घेता येते. ही केंद्रे खासगी केंद्रचालक चालवितात व त्यांच्यावर त्यांच्या निवडीपासूनच जिल्हाधिका-यांचे नियंत्रण असते. काही विभागांची स्वतंत्र पोर्टल्स आहेत उदा. महसूल विभागाचे महाभूलेख, परिवहन विभागाचे वाहन, सारथी इ.

हा अधिनियम लागू झाल्यापासुन १७ एप्रिल, २०२५ पर्यंत ऑनलाईन सेवांसाठी १८,७६,५२,११३अर्ज प्राप्त झाले त्यांच्या निपटाऱ्याचे प्रमाण ९४.१५% आहे. सन २०२४-२५ मध्ये एकूण ०२,७७,२८०११ सेवा अर्ज प्राप्त झाले असून निपटाऱ्याचे प्रमाण ९२.३३% आहे. अनेक अर्ज ऑफलाईन स्वरुपातही येतात. मात्र आयोगाने अनेक प्रयत्न करुन सुध्दा ऑफलाईन प्राप्त झालेल्या व निपटारा केलेल्या अर्जांची आकडेवारी संबंधित विभागांकडून उपलब्ध झालेली नाही. तथापी ही संख्या जवळपास ऑनलाईन आकडेवारीच असल्याचा अंदाज आहे.

मा.मुख्यमंत्री महोदयांनी अशा ऑफलाईन सेवा देण्याच्या प्रवृत्तींना आळा बसविण्यासाठी सर्व विभागांच्या सर्व सचिवांची विशेष बैठक घेऊन पुढील ३१ मे,२०२५ पर्यंत सर्व विभागांच्या सर्व सेवा या आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध करुन द्याव्यात तसेच उर्वरित ३०६ अधिसूचित सेवा ज्या सध्या ऑफलाईन आहेत त्या ऑनलाईन उपलब्ध करुन आपले सरकार या एकल पोर्टलवर संलग्न करुन १५ ऑगस्ट,२०२५ पर्यंत नागरीकांना उपलबध करुन देण्याविषयी निर्देश दिलेले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या तसेच आयोगाच्या वतीने मी महाराष्ट्राच्या सर्व जनतेला सेवा हक्क दिनाच्या शुभेच्छा देत आहे.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**